

# ब्रह्मदेशचा प्रवास

म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. नं. १०८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ........
विभाग ........
क्रमांक
नों. दि. ...

REFBK-0006114

— काका कालेलकर

# ब्रह्मदेशाचा प्रवास

— लेखक —

दत्तात्रेय बालकृष्ण कालेलकर

REFBK-0006114

अनुवादक

श्रीपाद जोशी.

मूल्य १॥ रुपया

प्रकाशक व व्यवस्थापक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार पेठ, पुणें २

संचालक
भ. र्‍यं. देशमुख,
बी.ए., एल्‌एल्‌. बी.

१ सर्व हक्क आचार्य काकासाहेब कालेलकर यांच्या स्वाधीन आहेत..
२ मुखपृष्टावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचें आहे.

क्रमांक ५१
१५ डिसेंबर

मुद्रक
विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

# आमचीं प्रकाशनें

( विभाग ............
( क्रमांक
( नों. दि.

## वि. स. खांडेकर

१ फुलें आणि दगड १।।।
२ घरट्याबाहेर १।।।
३ पहिलें प्रेम ( आ. २ री. ) ३
४ जळलेला मोहर ३
५ क्रौंचवध ४
६ सायंकाल (आ. २ री.) १।।
७ अविनाश १।।।
८ मंदाकिनी १।।।
९ सहा भाषणें १।।।
१० कलिका २।

## ग. त्र्यं. माडखोलकर

१ अवशेष २
२ नागकन्या २
३ माझी नभोवाणी २
४ नवे संसार ( जप्त ) ४
५ चंदनवाडी ६।।
६ व्यक्तिरेखा २।

## ना. धों. ताम्हनकर

१ तात्या भा. १ ला. २।।
२ तात्या भा. २ रा. ३
३ निवाडे भा. १ ला. २।।
४ चकमकी १।।
५ बच्चा नवरा १।।

## चिं. वि. जोशी

१ आणखी चिमणराव (आ.२) ४
२ नवें भारूड २
३ स्टेशनमास्तर २

## साने गुरुजी

१ पुनर्जन्म २।।
२ आस्तिक २।।

## दत्तु बांदेकर

१ सख्याहरी १।।।
२ नवी आघाडी १।।

## द. र. कवठेकर

१ अपुरा डाव ३
२ रेशमाच्या गांठी ३
३ आभाळाची सांवली ४

## वा. म. जोशी

१ स्मृति-लहरी २
२ विचार-लहरी २।
१ नवें जग ?–पु. य. देशपांडे २।।
१ रॉयचरित्र–भाई बेके १।।

## प. ले. वि. स. खांडेकर

१ काव्यज्योति १

## आनंदीबाई जयवंत

१ पारंब्या १।।

## लक्ष्मण० सरदेसाई

१ ढासळलेले बुरूज २

## प्रो. वि. ह. कुलकर्णी

१ व्यक्तिचित्रें २।।
१ फसगत–ना. ह. आपटे १।।
१ साखरपुडा–प्र. के. अत्रे १।।

## कृष्णाबाई मोटे

१ मीनाक्षीचें जीवन २।

## र. गो. सरदेसाई

१ चलतीं नाणीं २

## रा. श्री. जोग

१ सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८
१ हितपत्रें–ना. म. पटवर्धन ३

## वि. वि. बोकील

१ बेबीची बहीण ३
१ ग्रह आणि तारे–सत्यग्राही ४

## अनंत काणेकर

१ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ३

## काकासाहेब कालेलकर

१ ब्रह्मदेशाचा प्रवास १।।

# आगामी प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ चल ये राणी
४ विसावें शतक
५ तिसरी भूक
६ वर्षाकाल
७ छाया भाग १-२
८ वालुका
९ कालचीं स्वप्नें
१० चार भिंती
११ मंजिऱ्या
१२ मराठीचा नाट्यसंसार
१३ वा. म. जोशी ( व्यक्ति आणि वाङ्मय )

## ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ व्यक्तिरेखा
३ ऋणभार
४ माझे आवडते कवि
५ चक्रवर्ती उदयन
६ उर्वशी

## द. र. कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी

## ना. धों. ताम्हनकर

१ निवाडे भा. २ रा
२ गुजाताई
३ अनेक आशीर्वाद

## कृष्णाबाई मोटे

१ मवाली
२ कलाक्षेत्रांत

## काकासाहेब कालेलकर

१ स्मरण यात्रा

## अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे

## चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ

## वि. म. भुस्कुटे

१ स्टॅलिन

## सप्रेम समर्पित

*‘माझे काका*

***श्री. ह. मो. जोशी***

*यांना सादर’*

# आभार

सदर अनुवादास चांगलीशी प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल पू. काकासाहेबांचे एक जुने निष्ठावंत विद्यार्थी व माझे मित्र श्री. मुरलीधर घाटे यांचा मी अत्यंत ऋणी आहें.

सदर पुतस्कांतील काकासाहेबांचें सुंदर छायाचित्र दिल्याबद्दल त्यांच्या पुत्रवधु सौ. चंदुताई कालेलकर, एम. ए. ( बोस्टन ) यांचा मी अत्यंत आभारी आहें.

—श्रीपाद जोशी

अनुक्र
दिनां
क्र.
नों. दि.

# प्रस्तावना

‘ब्रह्मदेशचा प्रवास’ मीं १९३१ सालीं विसापूरचे तुरुंगांत असतांनां गुजरातींत वाचला. मला तो खूप आवडला होता. तो पुनः वाचावा असें कितीतरी वेळां मनांत आलें परन्तु तो मिळूं शकला नाही. पू. श्री. काकासाहेबांनीं हा प्रवास जरी सुमारें तीस वर्षांपूर्वी केलेला असला तरी तो आजहि अगदीं पूर्वीइतकाच ताजा आहे असें तो वाचल्यानंतर वाटूं लागतें.

काकासाहेबांचें सर्वच लिखाण काव्यमय असतें. त्यांनीं कविता केल्या आहेत कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. पण त्यांच्या लेखांचे जे अनेक खंड प्रसिद्ध झाले आहेत व होत आहेत ते वाचल्यावर ते हृदयाचे कवि आहेत अशीच खात्री होते. जिवंत काव्य हें सतत ताजें असतें. काकासाहेबांचें सर्वच लिखाण जिवंत व ताजें असतें. केव्हांहि वाचा तें नवीन जीवन-स्फुरण देईल. त्यांचें हृदय आर्य आहे नि तीच त्यांची संस्कृति आहे. ते जेथें जेथें जातील तेथें तेथें आपल्या दृष्टीनें पाहतील आणि तेथें त्यांना जें दिसेल तें जगाला दाखविण्याचा


आटोकाट प्रयत्न करतील. काकासाहेब हे जसे हृदयाचे कवि आहेत तसेच ते हाडाचे आचार्य आहेत. जेथें जेथें आर्यत्व व विभूतिमत्व दिसेल तेथून तेथून तें जमा करून परिवाराला निवेदन करण्यांत त्यांना अत्यानंद वाटतो.

ब्रह्मदेशाचा हा छोटासा प्रवास वाचतेवेळीं वाचक जीवनाच्या अनेक क्षेत्रांत एकदम प्रवास सुरूं करतो. हें प्रवासवर्णन वाचतांना वाचकाला जसें भूगोलाचें ज्ञान मिळतें तसें समाजाचेंहि दर्शन होतें. धर्म, समाज, व्यापार, चालीरीति, इतिहास या सर्वांचें आटोपशीर, अर्थ-ग्राही व गंभीर वर्णन वाचतेवेळीं आपल्याला काकासाहेबांच्या भाषा-प्रभुत्वाचा अंदाज लागल्याशिवाय राहात नाहीं.

भूगोल शिकतेवेळीं नद्या—शहरांची घोकंपट्टी व धान्या—फळांचीं नांवें पाठ करतां करतां नको हा भूगोल असें म्हणण्याची पाळी येते. पण ब्रह्मदेशाच्या प्रवासासारखीं प्रवासवर्णनें वाचतेवेळीं जणूं कांहीं आपणच प्रत्यक्ष प्रवासास निघालों आहोंत व समुद्र, आगबोटी, नद्या, शहरें, डोंगर, कारखाने, जंगलें, फळफळावळ वगैरे स्वतःच्या डोळ्यांनीं पहात आहोंत असा भास होतो.

माझे मित्र श्री. श्रीपाद जोशी हे पू. श्री. काकासाहेबांचे अगदीं निकटचे विद्यार्थी आहेत. त्यामुळें ते काकासाहेबांची विचारसरणी उत्तमप्रकारें समजूं शकतात. अनुवाद करतेवेळीं केवळ भाषा अवगत असून भागत नाहीं. मूळ लेखकाच्या विचारांशीं तन्मय होण्याचीहि जरूरी असते. सदर अनुवाद मूळ भाषेला अनुरूप असाच झाला आहे. श्रीपादनां अनुवादाचें जणूं वेडच आहे. या वेडाच्या भरांत त्यांनीं काकासाहे-बांचे सर्व ग्रंथ मराठींत आणावेत अशी माझी त्यांना विनंति आहे.

१५-१२-४३ —मुरलीधर घाटे



अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
ग्रा. क्र.

# विशेष विनंति

*सुमारें बारा वर्षांपूर्वी केलेला हा प्रवास त्याच्या आधीं केलेल्या हिमालयांतील प्रवासापेक्षां देखील स्मरणांत जुना आणि अस्पष्ट होऊन गेला आहे. हिमालयाच्या यात्रेंत विशिष्ट पवित्र भावनांची उत्कटता होती. ब्रह्मदेशाच्या प्रवासांत मात्र फक्त संस्कारलोलुप प्रवाशाचें कुतूहलच होतें. विस्मृतीच्या कराल दंष्ट्रांमधून जितकें वांचलें तेवढेंच येथें दिलें आहे. त्यांतहि बारीक सारीक बाबतींत कांहीं कांहीं ठिकाणीं खिचडी झाली असेल, कालांतरामुळें एकाद्या*

सकाळची संध्याकाळ देखील झाली असेल. तरीपण सगळें वर्णन यथार्थच आहे असें मला वाटतें. मला कांहीं काल्पनिक व आश्चर्यकारक वर्णनें तयार करावयाचीं नसून आपल्या मुशाफिरीचें वर्णनच करावयाचें आहे.

ब्रह्मदेश गुजराती लोकांना शेजारच्या घरासारखा आहे. कित्येक गुजरात्यांचें दरवर्षी तेथें येणें जाणें होत असतें. कित्येक कुटुंबें तेथेंच स्थायी होऊन राहिलीं आहेत. माझें हें वर्णन वाचून ब्रह्मदेशाचा इतिहास, तेथील लोकस्थिति आणि देशवर्णन लिहिण्याची प्रेरणा जर कोणास झाली आणि त्यामुळें माझें हें छोटेसें वर्णन विस्मृतींत लुप्त होऊन गेलें तर त्याचा मला आनंदच होईल.

(मार्च १९२७)

— २ —

गुजरात, बंगाल, तामिलनाड आणि आंध्र या चारी प्रांतांतील लोक ब्रह्मदेशांत जातात. महाराष्ट्रीय देखील तेथें थोडेसे आहेत. हिंदुहि आहेत नि मुसलमानाहि आहेत. आपण जेथें जाऊं तेथें केवळ आपलाच संकुचित स्वार्थ पाहूं नये. त्या त्या देशांतील मुलांत मिसळणें आपल्यास जुळलें पाहिजे. ब्रह्मी जनतेचा स्वभाव गुलाबी आहे. अशा शेजाऱ्यांना आपलेसें करण्यांत, खरें पाहतां स्वार्थत्याग नसून आपली उन्नति आणि आनंद आहे. ब्रह्मदेशांत गुजराती लोकांचें स्थान कांहीं विशेषच आहे. ब्रह्मदेश हिंदुस्तानपासून वेगळा होवो किंवा मिळून राहो, गुजराती लोकांसाठीं तेथें स्थान आहेच. तेथें जाऊन राहिलेल्या गुजराती लोकांनीं बौद्धधर्माचा समभावपूर्वक अभ्यास केला पाहिजे. समाजसेवकांनीं तेथें जाऊन हिंदी आणि

अह्मी दोन्ही समाजांची सारख्याच भावनेनें सेवा केली पाहिजे. हिंदुधर्म, बौद्धधर्म आणि इस्लाम या तिन्ही धर्मांचें ज्यानें समान भावनेनें आणि समभावानें अध्ययन केलें आहे अशा समाजशास्त्रज्ञांनीं अर्थनीति, विवाहनीति, राज्यनीति इत्यादि दृष्टींनीं तेथील प्रश्नांचा अभ्यास केला पाहिजे. आणि गुजरातसमोर जें उज्ज्वल भविष्य पसरलेलें आहे त्याला योग्य असा सल्ला तेथील गुजराती लोकांना दिला पाहिजे. गुजरात बाहेर जाऊन वसलेल्या गुजरात्यांच्या हातीं फक्त त्यांचा स्वतःचाच भाग्योदय नसून गुजरातचा आणि हिंदुस्तानचा भाग्योदय देखील कांहीं अंशीं त्यांच्या हातीं आहे. जेव्हां मोठें पद प्राप्त व्हावयाचें असतें तेव्हां हृदय देखील मोठें करावेंच लागतें. केवळ पोट मोठें केल्यानें भागत नाहीं.

हिंदुस्तानांतील पर्वत उभेहि आहेत आणि आडवेहि आहेत. सह्याद्रि, पूर्वघाट, अरवली आणि कर्तार हे उभे आहेत. हिमालय, शिर्वालिक, विंध्य, सातपुडा आणि महादेवाचे डोंगर हे आडवे आहेत. पर्वतांच्या रचनेचा संस्कृतीवर खूप परिणाम होत असतो. ब्रह्मदेशांतील सर्वच पर्वत उत्तर दक्षिण आहेत. त्याचा परिणाम तेथील जीवनक्रमावर कसा काय झाला आहे याची छाननी करण्याची शास्त्रदृष्टि अंगीं बाणविण्याची खास विनंति मी प्रवाशांना करीत आहे.

— ३ —

ब्रह्मदेशचा प्रवास मीं इ. स. १९१५ सालीं केला. त्याचें वर्णन इ. स. १९१७ च्या मार्च महिन्यांत लिहून काढलें, आणि तें प्रकाशित झालें इ. स. १९३१ च्या अखेरीस ! ते दिवस दांडीकूचानंतरच्या अस्वस्थतेचे होते यामुळें या पुस्तकानें वाचकांचें ध्यान

आपल्याकडे वेधून घेतलें नाहीं. हिमालयांतील प्रवासाच्या प्रमाणांत हें कांहींसें फिक्कें असल्यामुळें देखील लोकांना तें आकर्षक वाटलें नसेल, अथवा हिमालय जसा भारतीयांच्या भक्तीचा विषय आहे तसा ब्रह्मदेश नसल्यामुळें लोकांना त्याच्याविषयीं उत्कंठा वाटली नसेल. ७६ पानांच्या या पुस्तकाची किंमत नवजीवन प्रकाशन मंदिरानें फक्त दोन आणेच ठेवली ही गोष्ट देखील या पुस्तकाविरुद्ध गेली असेल. कारण कांहींहि असो याची दुसरी आवृत्ति निघण्यास आठ वर्षें लागलीं हें मात्र खरें. या दुसऱ्या आवृत्तीकडे वाचकांचें ध्यान जाईल आणी ब्रह्मदेशला जाणारे येणारे किंवा तेथेंच राहणारे संस्कारप्रेमी गुजराती लोक ब्रह्मदेशाविषयीं एकादें सुंदर पुस्तक लिहून याची तिसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग येऊं देणार नाहींत अशी मी आशा करतों.

यांतील ज्या कंडिकांमध्यें मीं माझें हृदय ओतलें आहे तेवढ्याच वेगळ्या काढून ‘ जीवननो आनंद ’ या पुस्तकांत संग्रहित केल्यामुळें त्या सुरक्षित राहतील, परंतु ब्रह्मदेशासंबंधीं गुजरातींत एक चांगलासा, जिवंत आणि तृप्ति देणारा ग्रंथ हवाच आहे.

वर्धा<br>
ता. १।१।४०

काका कालेलकर.

# समुद्राच्या पाठीवर

१

*गिरधारी तर अगदीं कंटाळून गेला होता. शान्तिनिकेतनला सुट्टी लागल्यामुळें सगळीं मुलें घरीं गेलीं होती. “ आपण असें एकटें एकटें किती दिवस रहावयाचें? दादांना यावयाचें नसेल तर ते न येवोत! आपण आजच निघूं या! ” असें म्हणून तासातासाला तो मला सतावीत असे. अखेर शेवटीं मुझफ्फरपुराहून श्री. जीवतरामांचें पत्र आलें कीं, ‘ मी परभारेंच तुम्हांला कलकत्त्यास येऊन मिळेन.’ आम्ही बोलपूरहून निघालों. कलकत्त्यांत तिघेहि*

गोळा झालों, परंतु गिरधारी आम्हांला कांहींच पाहूं देईना. त्यानें एकच हट्ट घेतला कीं 'आजच रंगूनला जाण्यास निघूं या.' पण तीन दिवसांचा समुद्राचा प्रवास, कांहीं तरी तयारी ही केलीच पाहिजे. लिंबू, आलें, फळें, पाव, लोणी वगैरे सर्व कांहीं घेतलें. डेकवर सोय व्हावी म्हणून मी खास माझ्यासाठीं एक आरामखुर्ची घेतली.

हुगळीच्या किनाऱ्यावर देशोदेशींचीं जहाजें नांगर टाकून पडलीं होतीं. कांहीं हजबे गरीब यात्रेकरू एका मोठ्या आवारांत जनावरांप्रमाणें कोंडले गेले होते. बिचारे तेथेंच अन्न शिजवून खात आणि तेथेंच झोपत.

संध्याकाळीं चारचा सुमार असेल. आमची आगबोट निघाली. ऊन्ह सौम्य झालें होतें. मंदमंद वारा वाहात होता. सूर्याच्या पाण्यावरील चांदीसारख्या चकाकीमध्यें पिवळेपणा येऊं लागला होता. धोक्याची सूचना देण्यासाठीं पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगत ठेवलेल्या लाल लाल लोह गोलकांना ('बोयां' ना) चुकवून आगबोट पुढें चालली. दोन्ही किनाऱ्यांवर जहाजें दिसत होतीं, छोट्या छोट्या होड्या दिसत होत्या. सेंट विल्यमचा किल्ला मागें टाकून आम्ही पुढें चाललों. कांहीं गोद्यांमध्यें लहान मोठीं जहाजें बांधलीं जात होतीं. दोन्हीं कांठांवरील जमीन पाण्याच्या सपाटीहून फार उंच नव्हती, यामुळें दोहों बाजूंस खूप दूरवर दिसत होतें. परंतु दृश्य कांहीं मनाला तृप्ति देईल असें नव्हतें. अशा मोठमोठ्या नद्या जेथें समुद्राला मिळतात तेथें कांठ खूपच घाणेरडे असतात. भरती-ओहटीमुळें भिजलेल्या चिखलाशिवाय कांहींच दिसत नाहीं.

जसजसे पुढें जाऊं लागलों तसतशी नदी रुंद होऊं लागली.

विभाग ... क्र. ... नों. दि.



दूरच्या कांठावर जेव्हां पांढरी रेती दिसली तेव्हां मन जरा स्वस्थ झालें. सुन्दर वनाचा प्रदेश पार करून रात्र होण्यापूर्वीं आम्ही डायमंड हार्बरजवळ येऊन पोहोंचलों. आमचें जहाज आतां लाटांबरोबर डोलूं लागलें. थोडा वेळ डेकवर उभें राहून आम्हीं लुप्त होणारा हिंदुस्तानचा किनारा पाहून घेतला. पण नन्तर घेऱ्या येऊं लागल्या. म्हणून आम्ही फराळ करून झोपीं गेलों. तत्पूर्वीं प्रार्थनेच्या शेवटीं गिरधारीनें 'आगुनेर परशमणि छोंवाव प्राने' हें रवीन्द्रनाथांचें सुन्दर पद म्हटलें. तें ऐकण्यासाठीं कित्येक लोक गोळा झाले. आणि त्या गायनाच्या प्रतापामुळें आम्हीं आमच्या पथाऱ्या ऐसपैस अंथरल्या तरी कोणीं आमचा हेवा केला नाहीं.

सकाळीं सर्वांआधीं मी जागा झालों. त्या वेळीं अरुणोदय देखील झाला नव्हता. आकाशांत जसा चंद्र चालत असतो तसें आमचें जहाज एकटें एकटें पाणी कापत चाललें होतें. काय ती त्या वेळची शान्ति! आगबोटीच्या अन्तरांतील यंत्ररूपी हृदय जर आपले ठोके ऐकवीत नसतें तर बाहेरील शान्ति इतकी उठावदार झाली नसती. चोहोंकडे जणूं काय लोखंडाचा किंवा शिशाचा थंड रस पसरला असावा असा दर्या दिसत होता. मी डेकच्या कठड्याजवळ जाऊन उभा राहिलों. जहाज जसजसें डोले तसतसें पाणी वर चढे आणि खालीं जाई. जिकडे पहावें तिकडे लाटा! लाटा एकमेकींवर आदळल्या कीं त्यांच्यांतून फेस निघे. अंधारांत हा फेस चमकतो, आणि त्या चकाकीच्या वांकड्या तिकड्या रेघा मिळून एक विचित्रच वेलबुट्टी दाखवितात. जहाजाच्या हालण्याचा परिणाम मेंदूवर होतो. त्यांतहि जर आपण लाटांच्या अखंड आणि सनातन नृत्याची लीला न्याहाळली तर मग तिचा कैफच चढतो.

पुढें गेल्यानन्तर लाटांचें फुटणें बंद झालें. सागराचें हृदय जागजागीं खालींवर होऊं लागलें. सामान्यपणें लाटांचें चढणें आणि फुटणें पहाण्यास मजा वाटते; परन्तु त्यांत तितकेंसें गांभीर्य नसतें. ध्वनिकाव्याचें रहस्य शब्दांनीं स्पष्ट केल्यामुळें जसें कमी होतें तशीच स्थिति लाटांच्या फुटण्यामुळें होते. पण जेव्हां लाटा आंतल्या आंत उसळतात आणि विलीन होऊन जातात तेव्हां त्यांचें सूचन विविध, अनन्त आणि अस्पष्ट असतें. अंधार असूनहि जेव्हां हवा स्वच्छ असते तेव्हां व्योम आणि सागर यांचें मीलन लक्ष वेधून घेतल्याशिवाय राहात नाहीं. क्षितिजापुढें लाटांचा प्रश्न नसतो. समुद्राच्या काळेपणाशीं तुलना केल्यास अंधारें आकाश देखील उजळ दिसतें. वेदकाळच्या ऋषींना जसें जीवनरहस्य दिसलें असेल तसें रात्रीच्या वेळीं क्षितिज दिसतें. ऋषींना अनन्त काळचीं आध्यात्मिक तत्त्वें अनन्त आकाशांत चमकणाऱ्या ताऱ्यांप्रमाणें स्पष्ट दिसतात, परन्तु पार्थिव जीवनाचा भविष्यकाळ त्यांच्या आर्ष दृष्टीसमोर देखील सागराच्या वारिराशीप्रमाणें अज्ञात, अव्यक्तच राहतो.

अशा प्रकारें ध्यान आणि कल्पना यांचा खेळ चालू होता, इतक्यांत अरुणोदयानें पूर्व दिशा नक्की करून दिली.

‘ आंधारेर गाहे गाहे परश तब
सारा रात फोटाक तारा नब नब ’

ही शोभा कमी होऊं लागली. मी जीवतरामना तें रक्तिम काव्य पाहण्यास उठविलें. ते उठण्यापूर्वींच गिरधारी उठला आणि म्हणूं लागला, ‘ मला दाखवा, काय आहे, मला दाखवा ना ! ’ त्याला मी काय दाखविणार ? तो एकादा पक्षी किंवा एकादें जहाज थोडेंच

होतें कीं ज्याच्याकडे बोट दाखवून मी दाखवूं शकेन? मीं त्याला म्हटलें, 'तें लाल आकाश दिसतंय ना? तें पहा! थोड्या वेळांत तेथें सूर्य उगवेल.'

आतां सागरानें आपला रंग बदलला. पूर्वेकडे जणूं काय लाल जांभळ्या रंगाचा धबधबा कोसळत होता. आणि आश्चर्य हें कीं पश्चिमेकडे देखील याच रंगाचा पडसाद उमटला होता. मात्र पश्चिमेकडे आकाशानेंच हा रंग जास्त उचलला होता. पूर्वेची प्रसन्नता वाढूं लागली. लाल रंगांत चमकेची भर पडली. कुंकुमाचा सिन्दूर बनला, आणि सिंदूरामधून सुवर्णाचा जन्म झाला. पश्चिम किनाऱ्यावरील आपण समुद्रावरील सूर्यास्ताची शोभा अनेक वेळां पाहूं शकतों, परंतु सागरमंथनामधून लक्ष्मी निघावी तशी उदीयमान उषेची वर्धमान शोभा पाहण्याचा आनंद कांहीं औरच असतो. आकाश जसजसें हसूं लागलें तसतशी समुद्राच्या मुखावर आनंदलज्जेमुळें फुगलेल्या शिरांची संख्या वाढूं लागली. जणूं काय दोन समवयस्क मित्रांत थट्टाविनोदच चालू असावा.

अेकीकडे हा प्रभातींचा विकास पाहण्यास मन लालचावत होतें तर दुसरीकडे जहाजाच्या डोलण्यामुळें चकरा येण्यास सुरवात झाली होती. माझ्या मनांत आलें, 'एक क्षणभर या लाटा थांबतील आणि जहाज स्थिर होईल तर किती छान होईल?' परंतु समुद्राच्या लाटा आणि माणसाचे मनोरथ कधीं थांबले आहेत? कंटाळून आरामखुर्चीवर पडण्याचा मी विचार करीत होतों इतक्यांत बालसूर्याचा घुमट आंघोळ करून पाण्यांतून बाहेर निघाला. उगवत्या सूर्याच्या बिंबावर एक विशिष्ट तरलता असते; जणूं काय थंडगार पाण्यामधून कांपत कांपत सूर्य बाहेर येत असतो. आणि पाण्यांत जो प्रकाश

पसरलेला असतो तो म्हणजे जणूं काय सूर्याच्या शरिरास चर्चिलेली कृष्णागरूची उटीच धुवून गेलेली असते, सूर्याचें बिंब पूर्णपणें बाहेर पडतांच मीं माझी प्रार्थना करून घेतली.

ध्येयः सदा सवितृमण्डलमध्यवर्ती
नारायणः सरसिजासनसंनिविष्टः ।
केयूरवान् मकरकुंडलवान् किरीटी
हारी हिरण्मयवपुर् धृतशंखचक्रः ॥

जीवतरामना असली गंभीरता मुळींच सहन व्हावयाची नाहीं. ते एकदम म्हणाले, 'बस करा, कसली वानरभाषा बडबडताय ती !' मीं त्यांना म्हटलें, 'चुकतां आहांत तुम्ही. ही तुमची भाषा नव्हे, संस्कृत आहे ही !' विनोदामध्यें भक्तीच्या उमाडलेल्या भावनांचा चक्काचूर झाला, आणि जहाजावर असतांना दररोज ज्यांतून पार पडावें लागतें अशा त्या भयंकर दिव्याची आम्ही चिंता करूं लागलों. शौचास जाण्यासाठीं डेकवरून खालीं जावें लागतें. खालचा मजला सामान्यपणें नेहमींच वाणेरडा असतो; परंतु सकाळीं तर हा मजला नरकाचाच प्रातिद्वंद्वी बनलेला असतो. हवा घाण आणि खारट. ठिकठिकाणीं लोकांनीं उलट्या केलेल्या. इंजिनाच्या वाफेमधून सुटणारा एक प्रकारचा वाण वास आणि खलाशांच्या स्वयंपाकघरां-तून त्याचवेळीं सुरू झालेली कांद्याची आणि मासळ्यांची दुर्गंधी, या सर्वांच्या मिश्रणांमधून पसार होऊन शौचकूपांत प्रवेश करण्यापेक्षां समुद्रांतच उडी टाकणें हें मला कमी त्रासदायक वाटे. हातची गोष्ट असती तर आम्हीं तीन दिवसपर्यंत शौचास जाण्याचेंच टाळलें असतें. पण——

जाऊन तर आलों, परंतु आम्हां तिघांचींहि तोंडें अशीं कांहीं

होऊन गेलीं होतीं कीं एकमेकांकडे पाहण्याचीहि इच्छा होईना. एकाद्या टोळक्यानें मारामारी करण्यास जावें आणि चांगला खरपूस मार खावा; अशा वेळीं ज्याप्रमाणें आपल्या सर्वसाधारण अनुभवाचा उल्लेख देखील कोणी करीत नाहीं, त्याप्रमाणें आम्हीं त्या दिव्याचें नांव देखील काढलें नाहीं.

मीं गिरधारीला म्हटलें 'चल खावून घे.' तो म्हणे, 'मला भूक नाहीं.' जीवतरामनीं देखील खाण्याचें नाकारलें. मीं म्हटलें, 'भल्या माणसांनो, ऊन्ह वाढलें कीं घेऱ्या येऊं लागतील. मग कसचे खाणार तुम्ही? थंड वेळ आहे, पोटभर खावून घ्या ऊन्ह होण्यापूर्वी. सर्व पचून जाईल.' गिरधारी विचारूं लागला, 'व्यायाम केल्याशिवाय आपोआपच पचून जाईल?' मीं उत्तर दिलें, 'आपल्या सगळ्यांच्या वतीनें हें जहाजच व्यायाम करीत आहे. तेव्हां तूं त्याची काळजी करूं नको.' गिरधारीला माझें म्हणणें समजलें नाहीं. तो माझ्या तोंडाकडेच पहात राहिला. आम्हीं तिघांनींहि पोटभर खावून घेतलें. आम्हां तिघांत जीवतराम पक्के. त्यांनीं रसाळ फळेंच खाल्लीं. मीं आपल्या पसंतीप्रमाणें खाऊन त्यावर एक सबंध लिंबू चोखलें. बिचाऱ्या गिरधारीला उत्तम केळ्यांची चटक लागली. त्यानें पोटभर केळींच खाल्लीं. एक दोन तासांच्या आंत तीं केळीं खाल्याबद्दल त्याला इतका कांहीं पश्चात्ताप झाला कीं सबंध प्रवासांत त्यानें पुनः केळ्यांचें नांवहि काढलें नाहीं.

दुपार झाली. मला माझी कमजोरी माहीत होती. मीं अंथरूण टाकून हातपाय पसरले. हातांत दुसरें एक लिंबू घेतलें आणि डोळे मिटून झोपून गेलों. दुरून मद्रासकडील एक जहाज कलकत्त्याला जात असावें, त्याला पाहून लोक म्हणूं लागले 'हें जहाज दिसतंय,

हें जहाज दिसतंय.' इतक्यांत दोन्हीं जहाजांनीं भों ओं......करून एकमेकांना सलामी दिली. पण मी मात्र डोळे मिटून कल्पनेच्या द्वारेंच तें दृश्य पाहून घेतलें. गिरधारीच्यानें राहवलें नाहीं. तो झटकन् उठून उभा राहिला. तो उभा राहतो न राहतो इतक्यांत त्याच्या केळ्यांनीं पोटांत राहण्याचें नाकारलें. तो घाबरला. मीं पडल्या पडल्याच त्याला पाणी दिलें. पडल्या पडल्याच आल्याचा तुकडा दिला. जरा शांत झाल्यावर तो माझ्या पथारीवर येऊन झोंपला. परंतु एकदां ढवळलेलें पोट कोठें एकदम शांत होत असतें?

आम्ही डेकवर झोंपलों होतों, त्याच्या एका बाजूला वरच्या केबिनमध्यें दोन देशी ख्रिश्चन बसले होते. त्यांच्यापैकीं एकाला उलटी होऊं लागली. जसजसा तो जोरजोरानें ओकाऱ्या देऊं लागला तसतसा त्याचा मित्र त्याची थट्टा करूं लागला. 'वन हिगिन्स उलटी करोइंग' वगैरे वगैरे त्याचे उद्गार त्या दुसऱ्या माणसाच्या उलटीपेक्षांहि जास्त जोरानें धावूं लागले. गिरधारी क्षणांत हंसायला जाई आणि मग पस्तावी.

जीवतरामना मात्र कांहींच झालेंच नाहीं. ते जहाजावर सगळीकडे फिरत आणि तोंडावर गंभीरपणाचा आव कायम ठेवून लोकांची थट्टा-मस्करी करीत. एक हिंदी बोलणारा व्यापारी आमच्या शेजारींच बसला होता. त्याच्या बरोबर त्याचें कुत्रें होतें. जीवतराम त्याला म्हणत, 'अजी अपने कुत्तेकी कुछ तारीफ तो सुनाअिये। देखनेमें तो जरा भी खूबसूरत नहीं है। इसकी कुछ खूबी होनी चाहिये। कुछ सुनाअिये तो सही।' तेथून उठून दुसरीकडे गेले. तेथें एक सिंधी व्यापारी भेटला. पहिल्या प्रथम तर आपण सिंधी नाहीं असा बहाणा करून ते त्याला सिंधविषयीं माहिती विचारूं लागले. तो

कांहींसा रंगांत येतांच जीवतरामनीं शुद्ध सिंधींत बोलण्यास सुरवात केली. तो मित्र म्हणाला, ‘आज जहाज जरा जास्त डोलत आहे. थोडीशी दारू प्यालेली असली कीं उलटी व्हावयाची भीति नसते. मी नेहमीं हाच इलाज करतों. तुम्हांला हवी असल्यास मी थोडीशी देवूं शकतों.’ जीवतरामनीं दारू घेण्याचें तर नाकारलें परंतु ते म्हणतात कसे, ‘माझ्या बरोबर दुसरा एक मित्र आहे. त्याला तुम्ही विचारून पहा. तो घेईल कदाचित्.’ बिचारा मित्र जीवतराम-बरोबर मजकडे आला. मला पाहतांच त्याची खात्री झाली कीं या ब्राह्मणाला विचारल्यास याचा धडधडीत अपमानच होईल. बिचारा ओशाळला आणि दोन इकडच्या तिकडच्या गप्पा मारून परत गेला. नंतर जीवतरामनीं मला आपल्या या पराक्रमाची सगळी हकीगत सांगितली.

असें होतां होतां संध्याकाळ झाली. आतां माझ्यांत पुन्हां जीव आला. आम्हीं पुन्हां थोडेसें खाऊन घेतलें परंतु ते कोणाला मानवलें नाहीं. संध्याकाळची शोभा मीं बसल्या बसल्याच पाहिली. लोक म्हणूं लागले, ‘आतां आपण काळ्या पाण्यांत आलों आहोंत.’ आणि खरोखरीच पाण्याचा रंग भीति वाटण्यासारखा काळाभोर दिसत होता. लोक म्हणूं लागले, ‘आतां अंदमान दिसेल.’ कांहीं म्हणूं लागले, ‘नाहीं, आपलें जहाज खूप दूर आहे. तें बेट दिसावयाचें नाहीं.’

संध्येची शोभा कांहीं वेगळीच होती. सकाळचे रंग आणि संध्याकाळचे रंग एकसारखे असत नाहींत. उदय आणि अस्त हे सारखे असतीलच कसे मुळीं? उदय हा बाल्यकाळ आहे तर अस्त हा विजयी वीराच्या निधानासारखा आहे. उषेच्या मुखावर मुग्ध

हास्य असतें तर संध्येच्या मुखमुद्रेवर क्षणजीवी उल्लास आणि विलास हीं असतात. समुद्राचे रंग पुन्हां बदलूं लागले. सूर्य मावळला आणि तारकांचा पारिजात फुलूं लागला. जहाजावरील विजेचे सौम्य दिवे तर केव्हांचे चमकूं लागले होते. मला हे दिवे लहानपणापासूनच फार आवडतात. इतके सौम्य कीं त्यांच्या जवळपासचें सर्व कांहीं स्पष्ट दिसतें, परंतु त्यांच्यामुळें डोळे मात्र दिपत नाहींत. अंधाराला मारून टाकून आपलें साम्राज्य प्रस्थापित करण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्यांत नसते. अंधाराशीं गोडशी तडजोड करून 'तुम्हीहि रहा; आम्हीहि राहूं' अशा तऱ्हेचें जीवनतत्त्व या दिव्यांनीं पसंत केलेलें असतें. शहरांतील विजेचे दिवे नव्या नव्या अध्यापकाप्रमाणें आपला सर्वच प्रकाश ओतून देवूं इच्छितात. आगबोटीचे दिवे योग्याप्रमाणें आत्मन्येव च सन्तुष्टः असतात.

अंथरुणावर पडल्या पडल्या आम्ही या दिव्यांसंबंधीं गोष्टी बोलत होतों, इतक्यांत आमच्या आगबोटीनें भों ओं......करून रेंकण्यास सुरवात केली. मीं ओळखलें कीं हिनें कोठें तरी दुसरी एकादी म्हैस पाहिलीय. इतक्यांत दुरून तसेंच रेंकणें ऐकूं आलें. मी उठून बसलों. मला रात्रींच्या वेळीं समुद्रांत जहाज पाहणें खूपच आवडतें. विजेच्या दिव्यांची एक लांबच लांब माळ, आणि उंच डोलकाठीवर दोन लाल लाल मोठाले दिवे भुताप्रमाणें जेव्हां अंधारांतून धावत जातात तेव्हां आपण जणूं काय पऱ्यांच्या प्रदेशांतच प्रवेश केला असावा असें मला वाटतें. जहाजाचा कोण जसजसा बदलत जातो तसतसें समोरील दृश्य नव्यानव्या प्रकारें खुलत जातें; आणि जहाज जेव्हां दूर जातें आणि लुप्त होण्याच्या बेतांत असतें तेव्हां तर झोंपेमुळें चालणाऱ्या स्मृतिविस्मृतीच्यामधील द्वंद्वासारखेंच तें दृश्य दिसतें.

आकाशांतील तारे पहात पहात मी झोपीं गेलों. तिसरे दिवशीं सकाळीं पाऊस पडूं लागला. जहाजावरील एका ख्रिश्चन कारकुनानें वर येऊन आम्हां सर्वांस खालीं जाण्यास सांगितलें. लोक याचें कारण लवकर समजूं शकले नाहींत. तो कारकून म्हणाला, ‘ एक मोठें वादळ आग्नेय दिशेकडून इकडे येत आहे असें दिसत आहे. ’ याला सायक्लोन म्हणतात. सायक्लोनमध्यें जहाज सांपडल्यास ती एक मोठी आफतच असते. पुष्कळ जहाजें सायक्लोनमुळें बुडून गेलीं आहेत. त्या कारकुनानें सांगितलें कीं ‘ असे डेकवर बसून रहाल तर काळवेळ आहे, वादळामुळें उडून जाल. ’ लोक भयभीत होऊन एका मागून एक खालच्या मजल्यावर निघून गेले. आम्हीं खालीं जाण्याचें साफ नाकारलें. त्यानें आम्हांला समजाविण्याचा प्रयत्न केला. आम्ही म्हणालों, ‘ वादळ आल्यास या मोठमोठ्या दोरखंडांनां पकडून आम्ही पडून राहूं. ’

‘ परंतु पावसामुळें तुम्ही भिजून जाल, ’

‘ भिजून जाऊं तसे कोरडे पण होवूं. ’

आमचा हट्ट पाहून कारकून निघून गेला. पाऊस आला. खूपच आला. वादळाचा घेर तीनचार मैलांचा असतो. सुदैवानें वादळ आमच्या जहाजापर्यंत आलें नाहीं. धूमकेतूप्रमाणें वादळाला चारी बाजूस शेपट्या असतात. अशा एका शेपटीचा सपाटा आमच्या जहाजाला थोडासा लागला. आम्ही चांगलेच भिजलों. म्हणून आम्ही वरच्या केबिनमध्यें जाऊन बसलों. तो आलाच विचारायला तर पाहून घेऊं असा विचार केला. असें सांगतात कीं भुताचें नांव घेतलें कीं तें येऊन हजर होतें. या न्यायानें तो कारकून हजर झाला. मला वाटलें कीं आपण त्याला सांगून टाकावें, ‘ केबिनचें

भाडें देऊं आम्ही; मग तर कांहीं तक्रार नाहीं ना ’? पण केबिनचें भाडें किती असेल याची कुणाला कल्पना होती? तेव्हां मी तर गोंधळूनच गेलों. जीवतरामनां अशा प्रसंगीं जरूर कांहीं तरी सुचावयाचें. त्यांनीं त्या कारकुनाला हंसऱ्या डोळ्यांनीं सांगितलें, ‘आतां जर तूं आम्हांला त्रास दिला नाहींस तर आम्हीं तुला खुष करूं.’ तो लोभी तेथून निघून गेला. पण दोनचार तासांनीं तो आमचें दर्शन घ्यावयास येत असे. उघडपणें तर तो कांहीं मागूं शकत नव्हता आणि जीवतराम त्याच्याशीं लाडीगोडीनें बोलून त्याला बाहेर काढीत. जेव्हां तो अगदीं स्पष्टपणें मागण्याच्या बेतांत आला तेव्हां जीवतराम म्हणाले, ‘अजून रंगून कोठें आलें आहे? आम्हांला या केबिनचा पुरेपूर फायदा घेऊं देशील कीं नाहीं?’

रंगून बंदर आलें. जीवतराम मला म्हणतात, ‘बंदर आलें कीं जहाजावरील सर्व अंमलदारांना आणि कारकुनांना खूप काम असतें. यामुळें तो कारकून आपल्यालाच धरून बसूं शकणार नाहीं.’ मीं म्हटलें, ‘परंतु तुम्हीं त्याला कबूल केलें आहे. तेव्हां त्याला कांहींतरी दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं.’ जीवतराम एकदम गंभीर होऊन म्हणाले, ‘लांच देण्याचें घाणेरडें काम माझ्यानें व्हावयाचें नाहीं.’ मला हंसूं आलें. मीं त्यांनां म्हटलें, “अहो धर्मावतार, तर मग आपण त्याला आशा कां दाखविलीत?’ जीवतराम म्हणाले, ‘मनुष्य त्याच लायकीचा आहे.’ बंदरावर तो आमच्यावर नजर ठेवून अगदीं वेळेवर आमच्यांजवळ येऊन पोहोंचला. मला वाटलें कीं आतां भांडाभांडी होणार. त्या कल्पनेनेंच मला अस्वस्थ केलें. जीवतरामनां अशा प्रसंगीं दुप्पट मजा वाटते. त्यांनीं एक चांगलासा हमाल पाहून आमचें सामान सर्वांत आधीं बंदराच्या धक्क्यावर धाडून

दिलें. मीं म्हटलें, ‘ तो हमाल सामान घेऊन पळून गेला तर ? ’ जीवतराम उत्तरले, ‘ गरीब लोकांमध्यें इतकी हिम्मत असत नाहीं. सामान गेलें तर खुशाल जावो, पण याला मात्र मी एक पैसुद्धां देणार नाहीं. ’

आम्ही धक्क्याकडे निघालों. तो कारकून गरम होऊन बडबडूं लागला. आतांपर्यंतचें ‘जंटलमन’ आणि ‘गोडबोले’ जीवतराम एकाएकीं बदलले. त्या गृहस्थाला लायक अशाच भाषेंत जीवतरामनीं त्याला एक लहानसें व्याख्यान सुनावलें. जेव्हां तो रस्ता अडवूं लागला तेव्हां जीवतराम म्हणतात, ‘ चल हट येथून, लाचखाऊ कुत्ता कुठला ! ’ आणि त्याला एक धक्का देऊन जीवतराम आमच्या मागोमाग आलेच. त्या कारकुनानें आमच्या देखत कलकत्त्यापासून रंगूनपर्यंत इतक्या कांहीं लोकांकडून पैसे उकळले होते कीं जीवतरामांचें तें करणें मला योग्यच वाटलें; बाकी मला स्वतः तसें करण्याची हिम्मत झाली नसती एवढें मात्र खरें !

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## रंगून— २

रबरी रस्त्यांच वर्णन वाचून आपल्याला जितकें आश्चर्य वाटतें तितकें आश्चर्य रबरी रस्ते पाहून कांहीं मला वाटलें नाहीं. मुंबईचे डांबरी रस्ते ज्यांनीं पाहिले असतील त्यांना रबरी रस्त्यांचें नवल वाटणार नाहीं.

नवल न कां वाटेना, परंतु अशा रस्त्यांचा फायदा मात्र स्पष्ट आहे. रस्त्यावर धूळ उडावयाची नाहीं, चिखल व्हावयाचा नाहीं; आणि गाड्याघोडीं वाटेल तितकीं धांवत असलीं तरी त्यांच्या

आवाजानें कान किटून जावयाचे नाहींत. इतक्या सोयीसाठीं शहरांतील मनुष्य वाटेल तें देण्यास तयार होईल.

रंगूनमध्यें रबरी रस्ते आहेत हें ऐकून आपल्याला कां बरें आनंद होत असेल ? आपण कांहीं रंगूनमध्यें रहात नाहीं. आपल्या नशिबीं तर गल्लींतील चिखल तुडविणेंच आहे. आपल्याला जो आनंद होतो त्याचें कारण एवढेंच कीं मनुष्यजातीला रस्त्याची एक प्रकारची अडचण दूर करण्याचा मार्ग सुचला. शक्ति वाढली, दृष्टि विस्तृत झाली, एकाद्या बाबतींत कौशल्य प्राप्त झालें कीं त्याचा आनंद हा व्हावयाचाच. परंतु रंगूनचे रस्ते पाहून मला मात्र आनंद झाला नाहीं. मला त्यामुळें थोडा देखील उत्साह वाटला नाहीं. मनांत प्रथम हा विचार आला कीं मुंबईसारख्या महानगरांत रबरी रस्ते कां नाहींत आणि ते रंगूनमध्यें कां आहेत ? समोरून धांवत येणाऱ्या एका रिक्शानें याचें उत्तर दिलें. रंगूनमध्यें रिक्शाचा प्रचार खूप आहे. रिक्शा ही ट्रायसिकलसारखी परंतु दोन मोठीं चाकें असलेली व एकच मनुष्य बसूं शकेल अशी गाडी असते, आणि तिला घोडा, बैल किंवा खेचर यांच्या ऐवजीं मनुष्य जुंपलेला असतो. रिक्शा ओढणारे द्विपाद बहुतेक आंध्रदेशचे तेलगू लोक असतात. ट्रामच्या घोड्याप्रमाणें त्यांच्या डोकीवर एक विचित्र टोपी असते. या रिक्शावाल्यांनीं आपापसांत चढाओढ करून भाडें इतकें कांहीं कमी करून टाकलें आहे कीं देह धारण करण्यासाठीं त्यांना सबंध दिवस रिक्शा ओढीत धांवावें लागतें. धांवतां धांवतां शक्तिपात होवूं नये म्हणून ते खूप दारू पितात, आणि असें ऐकिवांत आहे कीं या लोकांचें आयुष्य अशा जीवनामुळें खूपच कमी होतें. असा हा रिक्शा पाहून कोणाचें मन प्रसन्न होईल ? रिक्शांच्या सवलती-

साठींच रबरी रस्ते बनविलें असले पाहिजेत असें मीं अनुमान बांधलें.

गिरधारी म्हणाला, ‘ आपण एकदां रिक्शांत बसूं या. ’ माझ्याहि मनांत एक वेळ असा विचार आला कीं फक्त एकदांच या रिक्शाचा अनुभव घेतला असला म्हणजे बरें. पण मन कुठलें मानतें ? मीं गिरधारीला म्हटलें, ‘ रिक्शा हा मनुष्यजातीला लज्जास्पद आहे. आपण मोठ्या आरामांत बसावयाचें आणि माणसासारख्या माणसानें आपल्याला ओढीत धांवावयाचें हें काय बरें आहे ! ’ कधीं कधीं तर रिक्शांत दोघेजण देखील बसतात.

आम्हांला डॉ. मेहतांच्याकडे जावयाचें होतें. त्यांचा बंगला फारसा दूर नसल्यामुळें आम्ही पायीं चाललों. रस्त्यांत विचार आला कीं माणसानें माणसाकडून अशी सेवा घ्यावी ? हें जास्त लज्जास्पद आहे कीं पशूकडून अशी सेवा घेणें जास्त लज्जास्पद आहे ? जुलूमच करावयाचा असेल तर तो आपल्याच लोकांवर करणें हें जास्त चांगलें नव्हे काय ? केव्हां ना केव्हां तरी हृदय जागृत होईल आणि विरघळेल. मनुष्य अन्याय सहन करीत असेल तर तो तक्रार करूं शकतो, विरोध करूं शकतो. पशूंना तर बिचाऱ्यांना वाचा देखील नाहीं. दुसऱ्या दृष्टीनें पाहिल्यास माणसाला पशु बनविण्यांत भावनेचा खून जास्त होतो असें दिसून येतें. आपल्या लोकांविषयीं जर मनुष्य इतका निर्दय आणि बेशरम झाला तर दुसऱ्याविषयीं त्याच्या मनांत कसची दयाबुद्धि राहणार ? दयेचा विकासच आपल्यापासून सुरू होऊन परक्यापर्यंत पोहोंचण्यांत आहे. कांहींहि असो, परंतु ती रिक्शाची पद्धति मनाला थोडी देखील रुचली नाहीं. लहानपणापासूनच मेणे आणि पालख्या वाहणाऱ्या

भोयांना घामानें थबथबलेले पाहून, त्यांना बेहद्द धांपा टाकीत असलेले पाहून मला कसेंसेंच होई. रिक्शा ही त्याची आवृत्ति आहे असेंच वाटलें. गोकर्णास जातांना मी एका माणसाच्या खांद्यावर बसलों होतों. तेव्हां मी लहान होतों. आणि असें बसण्यांत मला वाईट वाटत नाहीं.

आम्ही डॉ. मेहता यांच्या येथें पोहोंचलों. आम्ही आधीं एकदां मुंबईत भेटलों असल्यामुळें ओळख करून द्यावयाची आवश्यकता नव्हती. आमचें स्वागत करून ते बगीच्यांत जमीन खणण्यास निघून गेले. रोज खाद्यपदार्थांच्या निर्मितींत आपण आपला कांहीं तरी वांटा उचलला पाहिजे हें तत्त्व ते स्वीकारीत असल्यामुळें बगीच्यांत नियमितपणें काम करीत असत. जीवतराम हळूंच मला म्हणतात, “ बघा, हे बॅरिस्टर, एम्. डी. जडजवाहिर विकून लाखोपाति झाले आहेत. तास अर्धा तास बगीच्यामध्यें त्यांच्या-बरोबर काम करून आपण सर्व जण श्रमजीवी असल्याचा दावा करतों !’

त्या दिवशीं आम्ही दमलेले होतों. म्हणून आम्ही विश्रांतिच घेतली. गिरधारी म्हणाला, ‘ हें सगळें घर असें डोलत कां आहे ? ’ मीं त्याला समजावून सांगितलें कीं ‘ घर डोलत नसून दर्या आणि जहाज दोन्ही आपल्या डोक्यांत घुसून बसले आहेत ! ’

दुसरे दिवशीं आम्ही देखील बगीच्यांत जाऊन खोरें व कुदळ चालवूं लागलों. स्नानासाठीं पाणी देखील सर्वजण आपल्याच हातांनीं काढीत असूं. जेवावयास बसलों तेव्हां तेथें मीं वीत वीत उंचीच्या लाकडी सोंगट्या पाहिल्या. जेवावयाच्या वेळीं कसला खेळ खेळला जात असेल याची मला कांहीं कल्पना आली नाहीं.

नन्तर पाहिलें कीं प्रत्येक जण मांडी घालून जेवावयास बसे तेव्हां गुडघ्याला त्या सोंगट्यांचा टेकूं देत असे. मी मनांत म्हटलें, ‘वाहवा रे सोय ! भोजनयोग चालत असेल तेव्हां आसन से मत डोल हें तत्त्व पाळलें गेलें पाहिजे खरें !’

रंगूनमध्यें पाहण्यालायक असें पुष्कळच आहे. सर्वांत पहिली गोष्ट मीं ही पाहिली कीं रंगून हें ब्रह्मदेशांत असूनही ब्रह्मी शहर नाहीं. गोरे, गुजराती, मुसलमान, चेट्टी ( मद्रासकडील लिंगायत सावकार ), बंगाली आणि सिंधी यांनींच हें शहर व्यापलेलें आहे. रंगूनमध्यें ब्रह्मी लोक दिसतात खरे, परन्तु ते जणूं काय ‘हें शहर आमचें नाहीं.’ एवढें सांगण्यासाठींच आले असावेत असें वाटतें. गांधीजींनीं एकदां ब्रह्मी लोकांना सांगितलें होतें कीं ‘ब्रह्मदेश हा कांहीं हिन्दुस्तानचा भाग नाहीं.’ तेव्हां तें मला आवडलें नव्हतें. हिन्दुस्तानच्या विस्तारांत ब्रह्मदेशहि सामावला गेल्यास तें इष्टच आहे अशी त्यावेळची माझी समजूत होती. ब्रह्मदेशांत आल्यानन्तर माझी खात्री होऊन चुकली कीं मनुष्य म्हणून किंवा आशियावासी म्हणून, अथवा विशाल अर्थानें आर्यधर्मी म्हणून आपण खुशाल भाऊभाऊ असूं, पण ब्रह्मी लोक कांहीं आपल्यासारखे नाहींत. त्यांची भाषा हिन्दुस्तानच्या भाषांहून अगदीं वेगळी, त्यांचा आहार वेगळा, त्यांची राहणीकरणी वेगळी, त्यांची संस्कृति वेगळी. एवढेंच काय पण त्यांची शरीररचना देखील आपल्याहून अगदीं वेगळी. त्यांचे डोळे, त्यांचा वर्ण, त्यांचे गाल, त्यांचें तोंड, आणि त्यांची दाढी किंबहुना दाढीचा अभाव, सर्वच आपल्याहून वेगळें. साम्राज्य लोभानेंच आपण ब्रह्मदेशाला हिन्दुस्तानचा विभाग म्हणूं शकतों. खरें पाहतां ब्रह्मदेश हा हिन्दुस्तानचा अवयव नसून स्वतंत्र शेजारी आहे.

ब्रह्मी चेहरा ईश्वरानें जणूं काय हंसण्यासाठींच खास बनविला असावा असा वाटतो. ब्रह्मी लोक आपल्यापेक्षां कमी दुःखी असतील असें तर मुळींच समजतां येणार नाहीं. त्यांच्यावर देखील इंग्रजांचें राज्य हें आहेच. परन्तु ब्रह्मी मनुष्य नेहमीं आनन्दी दिसतो. पुरुषांचा आणि स्त्रियांचा पोषाख जवळजवळ सारखाच. खालीं एक लुंगी आणि वर एक कुडतें. दोन्हीं कपडे रेशमीच असावयाचे. पुरुषांच्या डोक्यास एक रेशमी हातरुमाल गुंडाळलेला असतो. या रुमालाचा उद्देश डोकें झाकणें हा नसून तो फक्त शिष्टाचारासाठीं असतो. मक्याच्या कणसाच्या पाचोळ्यांत तंबाकूचीं पानें बांधून तयार केलेले चिरूट ओढण्याचा ब्रह्मी लोकांना खूप शोक असतो. त्यांचा चिरूटहि छोट्याशा कणसाइतका जाड आणि गोल असतो. आणि ब्रह्मी लोकांचें तोंड कांहींसें लहान असल्यामुळें त्या चिरूटामुळें दोन्ही ओठ भरून जातात. चिरूट ओढण्यांत स्त्रीपुरुषांचा भेद दिसत नाहीं.

आम्ही बाजाराकडे फिरावयास गेलों. तेथें असें दिसलें कीं ब्रह्मी दुकानांत तर त्यांच्या स्त्रियाच बसलेल्या असतात. मीं असें ऐकलें कीं तेथें स्त्रियांमध्यें पुरुषांइतकाच शिक्षणाचा प्रचार पहिल्यापासून आहे. स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत जगांतील इतर कोणत्याहि देशापेक्षां ब्रह्मदेश जास्त पुढारलेला असण्याचा संभव आहे. सामान्य शिक्षणाच्या बाबतींत देखील सुशिक्षित लोकांचें तेथील प्रमाण पाहतां हिन्दुस्तानशीं तुलना करण्याची इच्छाच होत नाहीं. हत्ती आणि बकरें यांच्यामध्यें कोणी तुलना करावयाची ? हें सर्व श्रेय ब्रह्मदेशच्या पुंगी लोकांना आहे. समाजाला या पुंगी संन्याशांना फक्त अन्नवस्त्रच द्यावें लागतें. त्याच्या मोबदल्यांत पुंगी लोक धार्मिक आणि

*व्यावहारिक शिक्षण सबंध देशाला फुकट देत असतात. ब्रह्मदेशांत मीं पुष्कळ पुंगी लोक पाहिले, परन्तु ते आपल्या येथील भटां-ब्राह्मणांप्रमाणें स्वमान विसरलेले दिसत नव्हते. आपल्याकडे भिक्षुक लोक मागण्यास येतात तेव्हां त्यांचा कोडगेपणा पाहून आपल्यालाच लाज वाटते. सकाळीं उठून पुंगी लोक भिक्षा मागण्यास निघतात त्या वेळचें दृश्य पाहण्यालायक असतें. बुद्ध भगवानाचा संघ पिंडपातासाठीं बाहेर पडत असेल तेव्हां असाच दिसत असावा असें मनांत आल्याशिवाय रहात नाहीं.*

# श्वेडेगॉन पॅगोडा ३

*रंगूनमध्यें काय काय पाहण्यासारखें आहे तें आम्हीं आधीं विचारून घेतलें. बुद्ध भगवानाच्या दांतावर बांधलेला मोठा स्तूप हें जुन्या गोष्टींपैकीं रंगूनचें मुख्य आकर्षण म्हणतां येईल.*

*दुसऱ्या कीं तिसऱ्या दिवशीं सकाळचा खोदण्याचा व्यायाम करून आम्हीं 'स्थिरसुख' आसनावर जेवावयास बसलों, त्या वेळीं कोणीतरी एक प्रकारचें फणसासारखें गोल फळ घेऊन आलें. त्याला दुरियान म्हणतात. दुरियानची गोडी आपल्या फणसापेक्षां जरा वर-*

चढच म्हणतां येईल. परंतु त्याचा दर्प आपल्याला सहन व्हावयाचा नाहीं. मीं एक दोन फोडी तोंडांत टाकल्या आणि तेवढ्यानेंच तृप्ति झाली. त्या सुद्धां मोठ्या मुष्किलीनें घशाखालीं उतरल्या असतील. इतर सगळे लोक तें मजेंत खात होते. त्या वासासंबंधींची घृणा मारून टाकावयाची कीं दुरियान खाण्याचें नाकारावयाचें याविषयींच डोक्यांत गोंधळ सुरू झाला. अखेर असें ठरलें कीं आपण अनुभव घेण्यास निघालों आहोंत आणि हें फळ कांहीं कुजलेलें नाहीं; तेव्हां तें संपविण्यांतच बहादुरी आहे. रंगूनमध्यें जितके दिवस राहिलों तितक्या दिवसांत दुरियान आवडविण्याचा प्रयत्न मला करावा लागे. कधीं मी हारत असें तर कधीं दुरियान.

आमचे एक जुने मित्र श्री. अण्णा ऊर्फ हरिहर शर्मा आम्हांला श्वेडेगॉन पॅगोडा पहावयास घेऊन गेले. बौद्ध लोकांच्या श्रद्धाभक्तीनेंहि नव्हे आणि युरोपियन लोकांच्या नंग्या कुतूहलवृत्तीनेंहि नव्हे तर कांहींशा सद्भावानें आणि आदरानें आम्ही तो प्राचीन स्तूप पहावयास निघालों. हा स्तूप एका उंचशा टेकडीवर आहे. वर जाण्यासाठीं पायऱ्या बांधलेल्या आहेत. लांब लांब पायऱ्यांमुळें कोणत्याहि स्थानाचें गांभीर्य वाढतें. थोडेसें विषयांतर करून अशा कांहीं पाहिलेल्या पायऱ्यांचें येथें श्राद्ध करण्याची इच्छा होत आहे. पुण्याजवळील पर्वतीवर चढण्याच्या पायऱ्या राजवंशी पण पवित्र वाटतात. दक्षिण कर्नाटकांतील कार्कलजवळील गोमटेश्वराच्या टेकडीवर चढण्याच्या पायऱ्या गरीब यात्रेकरूसारख्या वाटतात. नागपुराजवळील रामटेकच्या पायऱ्या एका बाजूनें मिरवणुकीच्या रस्त्यासारख्या वाटतात, तर दुसऱ्या बाजूच्या पायऱ्या वीर्यवान ब्रह्मचाऱ्यासाठींच बांधलेल्या असाव्यात असें वाटतें. शेत्रुंजा पर्व-

त्याच्या पायऱ्यांचा कांहीं ठावठिकाणाच नाहीं. आपल्या आहेत झालें. गिरनारच्या पायऱ्या हा पहाडी रस्ता आहे. अचलगडाच्या पायऱ्यांविषयीं देखील असेंच म्हणतां येईल. काश्मीरमधील शंकराचार्यांच्या टेकडीच्या पायऱ्या क्षणाक्षणाला थांबून आजूबाजूची शोभा पाहण्यास आमंत्रण देतात; तर मंडालेजवळील टेकडीच्या पायऱ्या म्हणजे जणूं काय व्यापाराचे प्राचीन मार्गच असावेत असें वाटावयास लावतात. पण त्यांचें वर्णन यानंतर आलें पाहिजे.*

पायऱ्या चढतांना ब्रह्मी दुकानदार स्त्रिया आम्हांला मेणबत्त्या विकत घेण्याचा आग्रह करूं लागल्या. चंदनाच्या खोडासारखें एक लाकूड सहाणेवर उगाळून त्याचा एक प्रकारचा लेप चेहऱ्यावर चोपडून त्या स्त्रिया आपल्या सौंदर्यांत वृद्धि करतात. आर्य स्त्रिया हळद फांसून सुवर्णवर्ण दाखवीत त्याचेंच हें आधुनिक अनुकरण असावें.

आम्ही वर गेलों. दुरूनच मुख्य स्तुपाच्या उंच शिखराकडे आमचें लक्ष गेलें. त्या शिखराचा आकार चाफ्याच्या पुष्पकळीसारखा आहे. आजकाल आपल्या घरांतून पणत्या निघून गेल्या आहेत; नाहींतर मी त्या धातुगर्भांची दीपज्योतीशींच तुलना केली असती. जंगलामध्यें असंख्य वेलींच्या अनेक जाळ्या एकमेकांत अडकतात त्याप्रमाणें या टेकडीवर लहानमोठ्या स्तूपांची गर्दी झालेली आहे. स्तूप बांधल्यामुळें बौद्ध माणसाला अगणित पुण्य मिळतें; यामुळें मनुष्य आपल्या शक्तीप्रमाणें जिथें तिथें स्तूप बांधतच जातो. शेत्रुंजाचीं मंदिरें, काशीचे महादेव, गोव्याचीं रोमन कॅथलिक चर्चें आणि ब्रह्मदेशांतील स्तूप हीं गवताप्रमाणें जिथें तिथें

* सिंहगड आणि नंदीदुर्ग येथील पायऱ्यांविषयीं इतरत्र लिहिलें आहेच.

उगवत असतात. मुख्य धातुगर्भा (=दागोबा=पॅगोडा) च्या आसपास त्याच्या लहान मोठ्या मुलांनीं कोंडाळें केलें आहे. जर त्यावेळीं आकाशांत काळे ढग पसरलेले असते तर गोवर्धन पर्वत उचलणारा श्रीकृष्ण आणि त्याचे बाळगोपाळ यांचेंच चित्र तेथें दिसलें असतें.

याच्या आसपास बुद्ध भगवानाच्या कित्येक मूर्ति ठिकठिकाणीं ध्यान लावून बसल्या आहेत. जीवतराम म्हणाले, 'काका, यांतील एकाहि मूर्तीचें तोंड ब्रह्मी पद्धतीचें नाहीं. सगळ्या मूर्ति हिन्दुस्तानच्या लोकांसारख्या दिसतात! हिन्दुस्तानांतील कारागीर आणवून या सर्व मूर्ति येथें बनविल्या असतील काय?' मीं म्हटलें 'असेंच असलें पाहिजे. किंवा तेथील कारागिरांनीं हिन्दुस्तानांतून कांहीं चांगल्या मूर्ति आणल्या असतील, आणि मग धार्मिक चिकाटीनें त्यांच्याच प्रतिकृती येथें घडाविल्या असतील. धार्मिक कलेंतील कांटेकोरपणा असाधारण असतो. आपल्या यज्ञाचीं पात्रें अमुकच लाकडाचीं आणि अमुकच आकाराचीं असलीं पाहिजेत. या नियमामुळें वेदकाळच्या कलेचे नमुने आज देखील पहावयास मिळतात.'

आजूबाजूला फिरतां फिरतां जीवतरामांचीच कल्पना मला जास्त बरोबर वाटली; कारण कांहीं मंदिरांच्या रुंद वळचणीमध्यें नाना प्रकारचीं पानें, फुलें आणि प्रसंग कोरलेले होते. त्यांतहि गाड्या, बैल, गाडींत बसलेलीं माणसें, त्यांचीं पागोटीं, सर्वच हिन्दी पद्धतीचें होतें. कांहीं मन्दिरांच्या छपरांवर आपल्याकडे असतात त्याप्रमाणें लोखंडी पन्हाळी असलेले पत्रे बसविलेले होते. परंतु ते आपल्याकडील छपरांसारखे भिकार दिसत नव्हते. छपराचे वेगवेगळ्या दिशेस

विभाग
क्रमांक
नों. दि



इतके कांहीं तुकडे पाडलेले असतात कीं लोखंडी पत्रे सुद्धां घराची शोभाच वाढवितात.

एका कोपऱ्यांत एका छपराखालीं कित्येक शिळा उभ्या करून ठेवलेल्या होत्या; जणूं कांहीं शिपायांप्रमाणें कवायत करण्यासाठींच त्या उभ्या राहिल्या असाव्यात. तपासाअन्तीं असें समजलें कीं, या शिळांवर महत्त्वाचे धर्मग्रंथ कोरलेले आहेत. दुसऱ्या कोपऱ्यांत एका मंदिरांत एक मोठी घंटा टांगलेली होती. " अरे बापरे ! केवढी मोठी घांट ही ! आपण सगळे तिच्यांत मावूं शकूं. " गिरधारी आनंदानें उद्गारला.

प्रदक्षिणा पूर्ण करून आम्ही मुख्य शिखराची शोभा पुन्हां न्याहाळूं लागलों. ब्रह्मी लोकांत पूजेचें एक अंग म्हणून सोन्याचा पातळ वर्ख डिंक लावून मूर्तीला चिकटवावयाचा असतो. वेडा भक्त हा वर्ख कुठें चिकटवील याचा कांहीं नियम नसतो. यामुळें कधीं कधीं मूर्ती म्हणजे होळीच्या धुळवडींत सांपडलेल्या गरीब खेडवळासारख्या दिसतात. पॅगोडाच्या शिखरावर ( किंवा स्तंभावर म्हणा ) सोन्याचा मुलामा चढविलेला आहे, त्यामुळें वाटेल तेथून पहा, त्याचा झगझगाट आपलें लक्ष वेधून घेतल्याशिवाय रहात नाहीं. या स्तंभाच्या टोकावर खालून लहान दिसणारी अशी एक छत्री बसविलेली आहे. अण्णांनीं सांगितलें कीं ' ही छत्री रत्नजडित आहे. इतके लाख कीं कोटी रुपयांचीं रत्नें त्यांत वापरलेलीं आहेत. ' ती रक्कम किती होती हें मी आतां विसरून गेलों आहें. आणि कल्पना करून कांहींतरी रक्कम लिहावी तर त्यांत अतिशयोक्ति दिसणार, आणि तरीहि खऱ्या रकमेपेक्षां ती कमीच असणार. म्हणून तो प्रयत्न सोडून देणें हेंच बरें.

श्वेडेगॉन पॅगोडा पाहून मला भूतकाळाचें कांहींसें दर्शन झालें.

भदंत शोण आणि उत्तर हे बौद्ध भिक्षु जेव्हां पहिल्या प्रथम या सुवर्णद्वीपांत आले तेव्हां येथील दशा कशी असेल? तथागताच्या दांताची येथें स्थापना करतेवेळीं त्यांच्या मनांत धर्मविस्ताराच्या कोणकोणत्या कल्पना आल्या असतील? पिशाच्याप्रमाणें मानल्या गेलेल्या येथील मूळ रहिवाशांना हा नवा धर्म स्वीकारण्यास किती वेळ लागला असेल? हिन्दुस्तानांतील धर्मोपदेशक, हिन्दुस्तानचे राजपुत्र, वणिक्पुत्र नि कारागीर जेव्हां येथें आले तेव्हां कोणत्या हेतूनें प्रेरित झाले असतील? नन्दनवनासारखा हा सुंदर आणि समृद्ध देश पाहून हॅनिबॉल किंवा शिकंदर यांच्याप्रमाणें लोभी आणि पापी दृष्टि त्या लोकांनीं या देशावर टाकली असेल काय? कीं त्यांच्या दृष्टीनें येथील लोकांचें धर्मविहीन जीवन पाहून त्यांना त्यांची दया आली असेल? ब्रह्मदेशांत पसरलेला बौद्ध धर्मच या प्रश्नाचें उत्तर देण्यास पुरेसा आहे.

व्यक्तिगत गायन आणि वृंदगायन, गृहरचना आणि नगररचना, आख्यानक आणि महापुराण, एक दिवस आणि सबंध ऋतुचक्र—या सर्वांत जसा फरक आहे तसाच फरक कलाकृतीमध्यें देखील पहावयास मिळतो. जयपूर आणि बनारस हीं दोन टोकें आहेत. बनारसमध्यें एक एक प्रासाद आणि मंदिर सुन्दरतेची मूर्ति असूनहि त्या सर्वांचा समूह ओबडधोबड दिसतो. त्यांतूनहि विचित्रतेचा रस आपल्याला मिळतो, आणि भक्तीमुळें सर्वच प्रिय वाटतें ही गोष्ट वेगळी. जयपूरची नगररचना पाहून इतकें तरी समाधान होतें कीं विचारी आणि सनाथ लोकांनीं योजनापूर्वक येथें वस्ती केलेली आहे. जयपूरची नगररचना सामाजिक आहे, तर बनारसची रचना म्हणजे टोळ्यांची गर्दी आहे. श्वेडेगॉन पॅगोडाची कळा देखील अशीच टोळीशाहीची

आहे. त्या वेळच्या लोकांच्या मुग्ध आणि धर्मप्रिय जीवनांत सहिष्णुतेची संस्कारी कला होती म्हणूनच हा स्तूपांचा रचलेला ढिगारा विशृंखळ असूनहि विश्री वाटत नाहीं.

येथून परततांना एका झाडाखालीं आम्हीं खेडवळ ब्रह्मी लोकांचा एक नाच पाहिला. स्वदेशांत असतांना नाच पाहण्यासाठीं उभे राहण्यांत आपल्याला लाज वाटते, परंतु परदेशांत कुतूहलवृत्ति प्रबळ असल्यामुळें तें सर्व यथायोग्यच वाटतें. अध्ययनवृत्तीखालीं इतर सगळ्या भावना दबल्या जातात. पुढें गेल्यावर एक ब्रह्मी पुस्तकालय लागलें. कोणालाहि न विचारतां आम्ही आंत गेलों. एका पुंगीनें आम्हांला ताडपत्राच्या कांहीं पोथ्या दाखविल्या. ग्रंथ खूपच काळजीपूर्वक ठेवले होते. ताडपत्रावर कोरलेलीं वाटोळीं, लाल आणि सोनेरी अक्षरें खूपच आकर्षक वाटत होतीं. तीं अक्षरें सुंदर होतीं खरीं, परंतु आमच्या दृष्टीनें तीं पुतळ्यांप्रमाणेंच मूक होतीं. आमच्याशीं तीं बोलेचनात. आम्हांला पाहून तीं कदाचित् म्हणत असतील, 'हे बहिरे लोक येथें कशाला आलेत?' इंग्रजी पुस्तकें तर सगळीकडे सारखींच असावयाचीं, परंतु त्यांत बाणभट्टाच्या कादंबरीच्या इंग्रजी भाषान्तराकडे माझें विशेष ध्यान गेलें! संस्कारी प्रौढ भाषेचें तें जंगल, इंग्रजींत उतरविणें किती कठीण आहे याचा अनुभव मी जेव्हां कॉलेजांत शिकत होतों तेव्हां मला आला होता.

दुसरे दिवशीं आम्हांला एका मद्रासी मित्राकडे जेवावयास जावयाचें होतें. त्यांचें नांव तर मी विसरून गेलों आहें, परंतु त्यांचें प्रेम आणि त्यांचें स्वादिष्ट रसम् केव्हांहि विसरलें जाणें शक्य नाहीं. मनुष्य जणूं काय श्रद्धाभक्तीची मूर्तिच. रामकृष्ण परमहंस आणि विवेकानन्द यांच्या वचनाविषयीं त्यांच्या टिकाणीं वेदतुल्य भक्ति

होती. माझा देखील तिकडेच अनुराग असलेला पाहून ते मला भावाप्रमाणें चाहूं लागले. अण्णा माझ्याशीं अचूक मराठींत बोलत. स्वाभाविकपणें मी मराठींतच उत्तर देईं. रामैयांना वाटे कीं जणूं काय आपण मोठ्या मेजवानीस मुकलों. प्रत्येक वाक्यानन्तर ते विचारीत, ' काय म्हणालांत तुम्ही ?' तेव्हां पुन्हां सगळा संवाद इंग्रजींत सांगावा लागे. अण्णा आपली संवय सोडावयाचे नाहींत आणि रामैयाची जिज्ञासा कमी व्हावयाची नाहीं.

त्या दिवशीं रात्रीं महाराष्ट्र मंडळाचें आम्हांला आमंत्रण होतें. आम्ही सगळेजण गेलों. पुष्कळ वर्षांनीं मराठी भाषा आणि महाराष्ट्रीय भोजन यांचा आकंठ लाभ मिळाल्यामुळें माझा अंतरात्मा खुलला. पुष्कळ वेळपर्यंत आम्ही बोलत बसलों.

आजकाल महाराष्ट्रीय लोक जेथें जातात तेथें आपलें एक मंडळ अवश्य स्थापन करतात. महाराष्ट्रीय लोक औपचारिक गांभीर्य पाळण्याचा प्रयत्न तर खूप करतात, पण तें त्यांच्या हाडींमाशींच नाहीं. थोडासा परिचय होण्यापूर्वींच उपचारांचें कवच गळून पडतें आणि मग मनमोकळेपणानें बोलण्यास सुरवात होते. उपचार आणि पॉलिसी या दोहोंची तरफदारी महाराष्ट्रीयच करतात; परन्तु दोन्होंपैकीं एकहि गोष्ट त्यांच्या रक्तांत नाहीं.

रंगूनमध्यें गुजराती आणि लिंगायत चेट्टी व्यापार करतात. चेट्टी लोकांचा व्याजबट्ट्याचा धंदा खूप जोरांत चालतो. आंध्रदेशाचे कोंगी लोक रिक्शा ओढतात आणि हमालाचें काम करतात. बंगाली लोक मोठमोठ्या सरकारी हुद्यांवर विराजमान असतात. वकील आणि डॉक्टर यांच्यांतहि बंगाली लोक बरेच आहेत. महाराष्ट्रीय विशेषतः रेल्वेंत काम करतात; नर पंजाबी शीख लष्करांत दिसतात. ही

*झाली त्यावेळची स्थिति. आज काय आहे कोण जाणे. माझ्या आठवणीप्रमाणें तांदळाचा व्यापार मुसलमानांच्या हातींच जास्त होता. कांहीं इंग्रज व मुसलमान ब्रह्मी स्त्रियांशीं लग्न करून ब्रह्मदेशांतच वसले आहेत असें मीं ऐकलें. चिनी आणि जपानी लोक देखील कुठें कुठें दृष्टीस पडत असत.*

# सरोविहार ४

*आतां पहावयाचें रंगूनजवळील प्रख्यात सरोवर. युरोपचा आकार जसा वांकडातिकडा आहे तसा या सरोवराचाहि आहे. यांत किती तरी आखातें, भुशिरें आणि संयोगभूमि असतील. रंगून हें कोंकणच्या अक्षांशावर असल्यामुळें व समुद्र नजीक असल्यामुळें तेथील हवा मला तर खूप मजेदार वाटली. जिकडे पहावें तिकडे मोठमोठीं झाडें. जणूं काय सृष्टीनें आपलें सर्वच वैभव दाखविण्यासाठीं बाहेर काढलें असावें. वनश्री आणि जलदेवता यांचें जेव्हां मीलन होतें तेव्हां तेथें लक्ष्मी ही न बोलावतांच यावयाची. आम्ही तिसऱ्या प्रहरीं त्या*

सरोवराजवळ जाऊन पोहोंचलों. कितीतरी वेळपर्यंत त्या सरोवराच्या कांठाकांठानें सहल केली. प्रत्येक कोपऱ्यांतून सरोवराची शोभा वेगळीच दिसे. कांहीं रूपगर्वित झाडें सरोवराच्या आरशांत आपलें रूप न्याहाळीत होतीं.

फिरतां फिरतां आम्ही अगदीं अधीर झालों. सरोवर हें नौकाविहारासाठींच ईश्वरानें निर्माण केलेलें आहे. हबशी जॉनला बोलावून आम्ही त्याच्या होडींत बसलों, आणि कोणत्याहि उद्देशाशिवाय अनेक दिशांना फिरलों. मध्यें एक बेट होतें. त्याची मुलाखत घेतल्याशिवाय कसें परत फिरावयाचें? बेटावर एक सुन्दर विश्रांतिगृह बांधलेलें होतें. त्याच्या पायऱ्यांच्या दोन भिंतींवर सिमेंटचीं बनविलेलीं दोन भयंकर अजगरें आरामांत पडलीं होतीं. होडी जरा वळविली कीं एकाएकीं श्वेडेगॉन पॅगोडा आपल्या उंच शिखराच्या द्वारें दर्शन देतो. आग्र्याच्या किल्ल्यांतून ताजमहाल पाहण्यांत जी मजा वाटते तशीच मजा येथें वाटते. वस्तूच्या जवळ गेल्यानें तिचें सौन्दर्य प्रगट होतें, परन्तु तिचें काव्य मात्र दुरूनच खुलतें. हा नियम माहीत असल्यामुळेंच चंद्रसूर्य आणि नवलाख तारे इतक्या दूर जाऊन विचरत असतील काय?

संध्याकाळ झाल्यामुळें आम्हांला नाइलाजानें परत फिरावें लागलें. शकुंतलेप्रमाणें सरोवरानें आम्हांला पुन्हां येण्याचें आमंत्रण तर दिलेंच. म्हणून दुसरे दिवशीं सकाळीं स्नानाचा कार्यक्रम काढून आमची एक मोठी टोळी निघाली. तेथें पोहोंचल्यानन्तर आमच्या बरोबरच्या लोकांनीं सांगितलें कीं, 'गोऱ्यांच्या बोटिंग क्लबमुळें या सरोवरांत आंघोळ करण्याची सक्त मनाई आहे.' ऊन्ह पडतांच कुमुद मिटून जावें त्याप्रमाणें माझा उत्साह मावळून गेला. इतक्या परिश्रमानन्तर रसपूर्ण सरोवरांत पोहण्याच्या आनन्दापासून वंचित होणें कोणाला

*आवडेल? पण आमच्याबरोबरचे लोक थोडेच सत्याग्रही होते? ते उघडउघड कायद्याचा विरोध करण्याऐवजीं चुपचाप कायदा तोडणें जास्त पसन्त करावयाचे. त्यांनीं सरोवरांत केव्हांच एक असा एकांत कोपरा शोधून काढला होता कीं जेथें गोऱ्यांच्या होड्या यावयाच्या नाहींत आणि दृष्टिहि पोहोंचावयाची नाहीं. त्या स्थानीं पोहोंचल्यावर मला असें दिसलें कीं त्याची शोभा कांहीं इतर कोपऱ्यांपेक्षां कमी नाहीं. एकांतांत चोरून स्नान करण्याचा लाभ घेण्यांत कांहीं निराळाच रस होता. गिरधारीला पोहतां येत नव्हतें, त्याचा श्रीगणेशा देखील येथेंच झाला. पाण्यांत तरंगत राहण्याचा अनुभव जेव्हां पहिल्याप्रथम मिळतो तेव्हां माणसाला जो आनन्द होतो त्याला उपमा द्यावयाची असेल तर अंडें फोडून बाहेर पडलेल्या पक्ष्याच्या आनंदाचीच देतां येईल. ऊन्ह खूप झालें तरी गिरधारी पाण्यांतून बाहेर पडण्याचें नांव काढीना. अर्धा तास जास्त थांबण्याची तो मला इंग्रजींत विनंति करी; आणि मीं ती ऐकली नाहीं कीं बंगालींत विनंति करी. जणूं कांहीं भाषा बदलल्यानें विनंतींत जास्त जोर येत असावा. ययातीला देखील जिथें जीवनाचा आनन्द सोडावा लागला तिथें आमच्या पोहण्याच्या आनन्दाचा शेवट व्हावा यांत काय आश्चर्य? थकलेल्या परन्तु हलक्या शरीरानें आम्ही परत फिरलों.*

*रस्त्यांत अननसाच्या बागा होत्या. दूरदूरपर्यंत कांटेरी अननसाचे फवारे जमिनींतून वर उडत होते. अननसाची एवढी मोठी बाग कधीं पाहिलेली नसल्यामुळें पोटांत भूक असूनहि व अननसाच्या प्राप्तीची थोडी देखील आशा नसतांहि आम्ही तेथें उभे राहिलों.*

# लेटाफाया

५

ब्रह्मदेश म्हणजे उत्तरेकडून दक्षिणेकडे धावणाऱ्या पहाडांच्या आणि नद्यांच्या जोडया. बंगालच्या उपसागराचें पूर्व टोंक म्हणजे ब्रह्मदेशाचा पश्चिम किनारा. तेथें प्रथम कुलादन नदी येते. नंतर येते आराकान योमाची पर्वतमाळ. त्यानन्तर सार्थनामा ऐरावती वाहते. ऐरावतीच्या रक्षणासाठींच जणूं काय उभे असावेत असे आराकान योमा आणि पेगु यामा हे दोन पर्वत दोन बाजूंस भिंतीप्रमाणें उभे आहेत. यानन्तर सुद्धां नदी, पहाड; नदी, पहाड असा क्रम चालूंच

आहे. यांतील सिट्टौंग नदी आणि सालविन नदी या दोन महत्त्वाच्या म्हणतां येतील.

आम्हांला सबंध ब्रह्मदेश पहावयाचा होता. म्हणून आम्हीं पेगु यामा पर्वताला उलटी प्रदक्षिणा घालावयाचें ठरविलें. रंगूनहून आगगाडीनें मंडालेपर्यंत गेलों, आणि तेथून स्टीमलाँचमध्यें बसून प्रोमपर्यंत परत आलों. बाकीच्या रस्त्यासाठीं पुन्हां रेल्वेस शरण जावें लागलें.

या रस्त्यानें पहिलें स्थान आलें पेगु. आमच्या आग्रहामुळें एका ब्रह्मी गृहस्थाच्या घरीं आमची उतरण्याची सोय करण्यांत आली होती. जेवणाचें मात्र आमचें वेगळें होतें. पेगूमध्यें खास पाहण्यासारखें म्हणजे बुद्ध भगवानाची सिंहशय्या* आहे. शहराबाहेर भग्नावशेषांमध्यें ही भव्य मनोहर मूर्ति पहुडलेली आहे. हिलाच लेटाफाया म्हणतात. सुमारें साडेतीनशें फूट लांब आणि आठ फूट रुंद ओट्यावर इतक्याच लांबीची बुद्ध भगवानाची मूर्ति विराजलेली आहे. आजच्या सरकारनें तिच्यावर लोखंडी पत्र्याचें एक छप्पर बांधलेलें आहे. एवढी मोठी मूर्ति जगांत दुसरी असेल कीं नाहीं हें आपल्याला माहीत नाहीं. पण हिची विशालता हेंच कांहीं हिचें वैशिष्ट्य नाहीं. प्रचंड मूर्ति पुष्कळ वेळां बेढब असतात. या मूर्तीत मात्र तिचें अंगसौष्ठव आणि मुखमुद्रेवरील मार्दवयुक्त स्मित हींच विशेष ध्यान आकर्षून घेतात. मूर्तीच्या पायाचे तळवे लहान मुलाच्या पायाप्रमाणें गुलाबी रंगाचे आहेत.

* योगी जेव्हां उजव्या कुशीवर पाय ताणून झोपतो आणि कोपर जमिनीवर टेकून उजव्या तळहातावर डोकें ठेवतो आणि डावा हात डाव्या कुशीवर व जांघेवर सोडलेला असतो तेव्हां त्या आसनाला सिंहशय्या म्हणतात.

दुरूनच या मूर्तीनें आपली मोहिनी आमच्यावर टाकली. आमचे पाय थांबले. अत्यंत आनन्द झाला कीं त्यांत भाग घेणारें कोणी आहे कीं नाहीं हें पाहण्याची आतुरता सहज निर्माण होते. मीं मूर्तीवरून दृष्टि काढून माझ्या मित्रांच्या चेहऱ्याकडे वळविली. त्यांच्या तोंडावर देखील त्या मूर्तीप्रमाणेंच प्रसन्न स्मित पसरलेलें मला दिसलें. हा पुन्हां नवा आनन्द ! नन्तर आम्ही जवळ गेलों. त्या मूर्तीच्या मस्तकाखालीं एक गोल उशी ( गिरदी ) चमकत होती. तिच्यांत विशेष शोभा नव्हती. पण मूर्तीच्या मानेखालील पोकळीमध्यें पक्ष्यांनीं जें घरटें बांधलें होतें त्याचें काव्य मात्र अवश्य चेतोहारी होतें. त्या घरट्यामुळें बुद्ध भगवानांचें विश्वव्यापी प्रेम आणि सत्त्वानुकंपा हीं विशेषपणें प्रगट होत होतीं. आज ही मूर्ति कुतूहलाचा विषय होऊन बसली आहे. ज्या वेळीं या प्रदेशांत बौद्धधर्म प्रज्वलित होता त्यावेळीं कोण जाणें किती साधकांनीं या मूर्तीचें ध्यान धरून समाधीचा लाभ मिळविला असेल. योगशास्त्र असें सांगतें कीं सिंहशय्या ही वीर्यरक्षण आणि अल्पनिद्रा यांच्यासाठीं विशेष अनुकूल आहे. अर्धी रात्र एका कुशीवर आणि बाकीची रात्र दुसऱ्या कुशीवर. मात्र मानेवरील ताण सहन करण्याची शक्ति असली पाहिजे.

प्रवासी हा कधीं कधीं कवितेमध्यें व्याकरण शोधण्याइतकाच अरसिक बनतो. मूर्ति किती लांबरुंद असेल याचा अंदाज केल्यानन्तर आम्ही विचार करूं लागलों कीं, ही कशाची बनविली असेल? दगडाची कीं मातीची? थोड्याशा चर्चेनन्तर आम्ही अशा निर्णयावर येऊन पोहोंचलों कीं सबंध मूर्ति विटांची बनविलेली आहे आणि तिच्यावर पांढऱ्या सिमेंटाचा गिलावा केलेला आहे. यामुळें तर

तिच्या शिल्पकाराच्या निर्माणशक्तीबद्दल जास्त आदर वाटूं लागला. अवयवांचें प्रमाण, त्यांचा घाट, आणि मुखमुद्रा हें सर्व त्यानें कसें काय साधलें असेल या कल्पनेंत आम्ही गर्क झालों. अमेरिकेंतील स्वतंत्रता–देवीची उंच मूर्ति काशाची बनविलेली आहे, तिचे अवयव देखील प्रमाणबद्ध असल्याची ख्याति आहे. तिच्या शिल्पकारानें प्रथम एक लहानशी सुरेख मूर्ति बनविली आणि मग तिच्या अवयवांचें प्रमाण त्रैराशिकानें वाढवून मोठी मूर्ति तयार केली असें म्हणतात. लेटाफायाच्या शिल्पकारानें कसें गणित केलें असेल ?

आमचें नीरस गणित फारसें चाललें नाहीं. मूर्तीची शांतिच पुन्हां हृदयांत व्यापून राहिली. परत जातांना देखील मागें वळून वळून त्या शान्तिराजाचें दर्शन घेण्याची इच्छा होत होती.

घरीं आल्यानन्तर आमच्या गृहपतीशीं बोलणें झालें. ‘ तडागत बुडा ’ च्या ‘ धम्मा ’ विषयीं त्यांनीं कितीतरी गोष्टी सांगितल्या. हल्लींच्या ब्रह्मी लोकांच्या धर्मविमुखतेविषयीं सन्ताप व्यक्त केला. मीं त्यांना म्हटलें, ‘ त्रिपिटकाचें महाशास्त्र तुम्हांला ज्या देशांतून मिळालें आहे, त्या देशाच्या लिपींत तें आज उपलब्ध नाहीं ही किती दुःखाची गोष्ट आहे ! तुम्ही लोक गोऱ्यांच्या रोमन लिपींत पालि ग्रंथ छापण्यास मदत करतां. तेच ग्रंथ जर तुम्हीं देवनागरींत छापविले तर बुद्ध भगवानाचे देशवासी त्या प्राचीन अनुशासनांत फिरून रस घेऊं लागतील. ’ ते म्हणाले, ‘ पण हें काम तर तुमचेंच आहे. आमच्यांकडून मदत मिळणार नाहीं असें नाहीं. पण तें आम्ही पार पाडूं शकणार नाहीं. ’ पुढें ते असें म्हणाले, ‘ हिन्दुस्तानविषयीं आम्हांला अमर्याद आदर आहे. आमची ती धर्मभूमि आहे. दरवर्षीं

कित्येक ब्रह्मी लोक तेथें यात्रेस जातात. परंतु मोठ्या दुःखानें असें म्हणावें लागतें कीं तुमच्या देशांत आतिथ्यच नाहीं.'

माझ्या देशाविषयीं अशा तऱ्हेची टीका ऐकण्यास मी तयार नव्हतों. मी अगदीं आश्चर्यचकित झालों. आतिथ्यधन भारतवर्षाविषयीं असली टीका! माझ्या भावना दाबून मी त्यांना जरा हलक्या आवाजांत म्हणालों, 'तुम्ही आपलें म्हणणें जरा जास्त स्पष्ट कराल तर बरें. आम्ही असें समजतों कीं आतिथ्य हा आमच्या देशाचा खास गुण आहे. त्याविषयीं आम्हांला कांहींसा गर्वहि वाटतो.'

आमचा गृहपति संस्कारी मनुष्य होता. त्यानें जरा देखील चिडल्याशिवाय, पण दुःखित आवाजानें म्हटलें, 'आमचा अनुभव वेगळा आहे. तुमच्यांत आपापसांत आतिथ्य खूप असेल, मी नाहीं म्हणत नाहीं. पण परदेशांतील लोकांविषयीं मात्र तुम्ही अगदींच— मी तुसडे म्हणत नाहीं पण—उदासीन असतां. तुमच्याकडे पाणी मागायला जावें तर तुम्ही पेलाहि देत नाहीं; माणसाला रस्त्यावर बसवून ओंजळीनें पाणी पिण्यास सांगतां. याचें नांव काय?'

आतां मला उमगलें. शिवाशिवीच्या, स्वच्छतेच्या आणि पवित्रतेच्या विचित्र कल्पनांमुळें परकीय लोकांना आपण किती दुखवितों याची आपल्याला कोठून कल्पना असणार? माझ्या वाहणेखालीं कुणाचा तरी आंगठा चिरडला गेल्यास त्याचें दुःख मला थोडेंच समजणार? घरच्या अंत्यजांशीं आपण कशा प्रकारें वागत असतों याचाच विचार पुरेसा आहे. मुसलमान, पारशी, ख्रिश्चन आपल्यांत मिसळत नाहींत, याबद्दल कांहीं अंशीं आपण स्वतःच जबाबदार आहोंत हें विसरतां कामा नये.

*विश्वबंधुत्वाचा आर्य आदर्श जगासमोर ठेवणाऱ्या बुद्ध भगवानाच्या देशांतील लोक आन्तरराष्ट्रीय शिष्टाचार केव्हां बरें अंगीं बाणवतील ?*

## बौद्ध टेकडी

६

पेगूपासून मंडालेपर्यंतचा प्रवास चांगलाच लांबलचक म्हणतां येईल. रस्त्यांत उद्योगी शेतकरी भाताच्या शेतांत काम करीत असलेले पाहून मला माझ्या लहानपणींचे दिवस आठवले. मी देखील अशाच प्रकारें काम करीत होतों. पण तें हौसेखातर. हे लोक आपली आणि जगताची आजीविका पुरी करण्यासाठीं बारा महिने देह कष्टवीत होते. अधूनमधून दूरवर चमकणारा एकादा लहानसा स्तूप दिसे. कोणत्याहि देशांत तेथील शेती आणि तेथील मंदिरें मला सर्वांत अधिक काव्यमय आणि पवित्र वाटलीं आहेत. दोन्ही मिळून

जनतेचें जीवन संपूर्ण होतें असें म्हणण्यांत थोडी देखील अतिशयोक्ति नाहीं. आणि ब्रह्मी मंदिरें तर शाळाहि आहेत. अन्न, ज्ञान आणि समाधान यांत मानवी जीवन कृतार्थ होणार नाहीं तर तें विकृतच समजलें पाहिजे. आगगाडीच्या प्रवासांत आपण डोळे फाडफाडून दूरपर्यंत पाहतों; तरी देखील पाहिलेलें कांहींच ध्यानांत रहात नाहीं. रेल्वेचा वेग माणसाला खुशाल आवडत असो पण तो त्याला मानवत मात्र मुळींच नाहीं.

मंडाले स्टेशनावर माझें ध्यान पहिल्याप्रथम स्टेशनावरील स्टेशनाच्या नांवाच्या पांढऱ्या पाटीकडे गेलें; कारण तेथें देवनागरी अक्षरांत ‘मन्दले’ असें लिहिलेलें होतें. स्वदेशांत नेहमींच्या वापरण्याच्या नाण्यांवर देखील जी लिपि पहावयास मिळत नाहीं ती या परदेशांत रेल्वेच्या पाटीवर पाहून आश्चर्य आणि आनंद कां बरें वाटणार नाहीं? हिंदुस्थानांतील पुष्कळ लोक येथें येत असल्यामुळेंच रेल्वेला देवनागरींत नांव लिहावें लागलें असेल.

शहरांत आम्ही एका गुजराती जवाहिऱ्याकडे उतरलों. गृहपति खूप मायाळू आणि विचारवान् गृहस्थ होते. आमच्यांत यात्रीसुलभ अधीरपणा होता. जेवढें पाहण्यालायक असेल तें सर्वच्या सर्व एकदम गिळून टाकावें आणि पुढें पळावें, अशी आमची वृत्ति होती. मुशाफराला वाटतें कीं, पृथ्वी चोवीस तासांत २५ हजार मैल आपल्या आंसाभोंवतीं फिरते आणिं अन्तरिक्षांत दर सेकंदास ३० किलोमिटरच्या वेगानें धांवते, तर आपण पृथ्वीनिवाशांनीं तिचें कांहीं ना कांहीं अनुकरण करावें. आमच्या गृहपतीला वाटे कीं आत्तां कुठें पाहुणे आले आहेत, त्यांची सरबराई करावी, गप्पागोष्टी कराव्यात; पहावयाच्या गोष्टी तर येथें पडल्याच आहेत, वाटेल तेव्हां

पाहतां येतील; त्याची इतकी घाई कशाबद्दल? आपण शाकाहारी लोक वनस्पतींच्या संबंधामुळें इतर लोकांपेक्षां जास्त स्थावर आहोंत कीं काय कोण जाणे, पण आपलें जग धांवतच नाहीं.

मंडालेंत खास प्रेक्षणीय गोष्टी म्हणजे तेथील बौद्ध टेकडी आणि थीबा राजाचा किल्ला या होत. प्रथम आम्ही टेकडी पाहण्यास गेलों. टेकडीच्या पायथ्याशींच सुन्दर इमारती आणि मूर्ती आहेत. त्या पाहून आम्ही वर चढलों. टेकडी बरीच उंच आहे. तिचा विस्तारहि खूप आहे. बौद्ध साधूंनीं सबंध टेकडी अनेक प्रकारें सुशोभित केलेली आहे. थोडेसें चढलें कीं एकादा मंडप दिसावयाचा. पुन्हां जरा चढलें कीं स्वर्ग आणि नरक यांचीं चित्रें यावयाचीं. ( शेत्रुंजा-वर देखील अशींच चित्रें पहावयास मिळतात. ) आणखी वर गेलें कीं बुद्धाच्या किंवा बोधिसत्त्वाच्या पवित्र मूर्तीसमोर आपलें मस्तक नमावयाचें. निम्यापर्यंत गेल्यावर तेथील बोधिसत्त्वाच्या एका अखंड दंडायमान उंच मूर्तीनें आम्हांलाहि डोकें वर करावयास लावलें. मूर्तीनें आपला हात सरळ लांब केला होता, जणूं काय दूर क्षितिजाकडे ती आपल्याला कांहीं तरी दाखवीत असावी! कारा-गिरांना अशा मूर्ती घडविण्याचें कसें स्फुरत असेल? या मूर्तींत मीं असाधारण व्यक्तित्व पाहिलें. आपलें मौनव्रत मोडेल तर ही आतांच मेघगिरेनें कांहींतरी सन्देश ऐकवील असें वाटत होतें.

तेथूनहि वर गेलों. तिथें ठिकठिकाणीं बौद्ध मठ होते. विद्यार्थी अध्ययन करीत होते. टेकडीच्या आरोहणांत प्रतिपर्व रसावहम् असा अनुभव येत असल्यामुळें जसजसे वर गेलों तसतशी अगदीं टोंकावर जाण्याची उत्कंठा वाढूं लागली. या उत्कंठेमुळें आणि सर्वांत उत्तम

असें जें कांहीं आहे तें शिखरावरूनच पहावयास मिळणार आहे या अपेक्षेमुळें मधल्या दृश्यांची आम्ही पूर्ण किंमत करूं शकत नव्हतों.

जसजसे वर चाललों तसतसा टेकडीच्या आजूबाजूचा प्रदेश स्पष्ट दिसूं लागला. तेथें देखील छप्परवाले रस्ते मंद किंवा तीव्र गतीनें टेकडी चढत होते. अखेर शेवटीं अगदीं टोंकावर जाऊन पोहोंचलों. तेथें आम्हीं काय पाहिलें? लाखी कामाच्या रंगीत डब्यांत ज्याप्रमाणें एकामध्यें दुसरा, दुसऱ्याच्या पोटांत तिसरा याप्रमाणें डबे असतात आणि आंत काय आहे हें पाहण्याच्या उत्कंठेनें आपण उघडत जातों तशा प्रकारच्या उत्कंठेनें आम्ही वर आलों. त्या डब्यांच्या पोटांत सर्वांत लहान डबी इतकी कांहीं लहान आणि तुच्छ असते कीं तिच्यांत कांहीं मावण्याचा प्रश्नच नसतो. तिच्या लहानशा अवकाशांत फक्त निराशाच मावूं शकते. या टेकडीवर असाच अनुभव आला. अगदीं शिखरावर खास पाहण्यासारखें असें कांहींच आढळलें नाहीं. दूरदूरपर्यंतचें दृश्य पाहण्याइतकी उंची आम्हीं मिळविली होती एवढाच फायदा. अनात्मवादी बौद्धधर्माचेंच जणूं कांहीं त्यांत सूचन होत होतें. संस्कारांचें पृथक्करण करून अगदीं टोंकापर्यंत गेलांत कीं तेथें तुम्हांला कांहींच मिळावयाचें नाहीं. तेथें शून्यच आढळावयाचें. परन्तु भरीव शून्याचेंच दुसरें नांव अनन्त आहे.

समाधीनन्तर व्युत्थान व्हावें त्याप्रमाणें आम्ही टेकडीवरून खालीं उतरलों. उतरतांना निराळा रस्ता पकडला. जवळजवळ सुकून गेलेल्या पानांची शोभा चोहोंकडे दिसत होती, यामुळें जेथें तेथें वैराग्याचें सूचन होत होतें.

# राजप्रासाद

## ७

मंडाल्याचा किल्ला लष्करी दृष्टीनें अगदीं निरुपयोगी आहे. एवढी मोठी टेकडी बाजूला असून तिच्यावर जर पक्का लष्करी बन्दोबस्त नसेल तर त्या किल्ल्याची किंमत काय? आणि किल्ला बांधला आहे तोहि बरोबर चौरस! बचाव करावयाचा असेल तरी देखील आंतील फौज पुरेसा बचाव करूं शकणार नाहीं. किल्ल्याच्या कोपऱ्यांवर ताबुताप्रमाणें लहान लहान घुमट उभारले आहेत, यामुळें किल्ला अगदींच अरसिक दिसत नाहीं. युद्धाची थोडीसुद्धां कल्पना

नसलेल्या आणि किल्ला हा एक प्रतिष्ठेचा किंवा शोभेचा पदार्थ आहे असें समजणाऱ्या कोणीतरी हा येथें बांधला असावा. किल्ल्याच्या आंत आम्ही फारसे फिरलों नाहीं. आंतील मुख्य राजप्रासाद मात्र पाहून घेतला.

छप्परें बांधण्याची कला ही ब्रह्मी लोकांचीच. बंगालच्या छप्पराहून हीं अगदीं उलट आहेत. हत्तीच्या पाठीवर चौकोनी जाजम किंवा चादर घातली असतां जसा आकार होईल तसा आकार बंगाली छप्परांचा असतो; तर ब्रह्मी छप्परें ढिल्या तंबूच्या कॅनव्हाससारखीं असतात. पावसाचें पाणी अशा छप्परांवर जसजसें जास्त जास्त पडतें तसतसें जास्त जोरानें दूर फेंकलें जातें. कांहीं लोक मिशांचे आकडे जसे वर चढवितात तसे ब्रह्मी छप्परांचे चारी कोपरे उंच चढविलेले असतात. 'तुम्ही काय समजतां? आम्हीहि कोणीतरी आहोंत म्हटलें,' असेंच मोठ्या गर्वानें हे कोपरे म्हणत असावेत असे वाटतात.

जसें छप्परांत वैशिष्ट्य आहे तसें घरांतील भुईंत देखील कांहींसें वैशिष्ट्यच आहे. या प्रदेशांत पाऊस खूप पडतो. आणि लोकांच्या खास राहण्याच्या जागीं पुष्कळ वेळां पावसाचें पाणीच पाणी होत असेल. म्हणून घरांतील भुई जमिनीहून नेहमीं उंच ठेवतात. आपल्याकडे आपण उंच ओटा बांधतों. ब्रह्मी लोक बाहेरील जमीन आणि घराची भुई यांच्यामध्यें एक उघडी पोकळी ठेवतात. पावसाचें पाणी आलें कीं तें घराखालून निघून जावें. शेतांत राखण करण्यासाठीं ज्याप्रमाणें चार खांबांवर अधांतरीं झोंपडी बांधलेली असते तशासारखीच ही बांधणी म्हणतां येईल. घरें इथूनातिथून लाकडाचीं आणि बांबूचीं. एका लहानशा घराची भुई तर बांबूच्या मऊ साली (पाठी)-

पासून बनविलेल्या चटईंचीच होती. अशा घरांना खालूनहि दार ठेवतां येईल.

राजप्रासादाच्या सुन्दरतेपेक्षां त्याचा साधेपणाच मला जास्त आवडला. आगीपासून बचाव करण्यासाठीं म्हणून प्रत्येक दालनांत कोरड्या मातीच्या उघड्या पेट्या ठेवल्या होत्या.

कोणत्याहि समाजाची मनोरचना आणि अभिरुचि यांचा कस जसा त्याच्या संगीतावरून पाहतां येतो तसा त्याच्या रंगाच्या पसन्तीवरूनहि तो काढणें शक्य आहे. बनारसी कामांत अमुक प्रकारचेच रंग वापरलेले असावयाचे. सिंधमधील हालाचें मातीकाम आणि लाखेचें काम अमुक प्रकारच्या रंगांतच खुलतें. रंगाची मद्रासी अभिरुचि वेगळी आणि महाराष्ट्रीय आभिरुचि वेगळी. मध्य आशियांतील गालीचांत आणि इजिप्तच्या प्राचीन चित्रांत रंगाचें गांभीर्य विशेषेंकरून दिसतें. ब्रह्मदेशांत वेतांच्या भांड्यावरील रंग आणि भिंतीचे रंग यांच्यांत असाधारण मेळ असतो. कपड्यांच्या बाबतींत मात्र त्यांची अभिरुचि कांहींशी निराळी असते. यामुळें घरें आणि पोषाख यांच्या विरोधामुळें दोन्ही विशेष उठावदार होतात. भडकदार रंग उथळपणा सुचावितो. अतिगंभीर रंगामुळें सुतकी वातावरण निर्माण होतें. थोडा वेळ त्यांत गम्मत वाटते परंतु फार दिवस अशा रंगामध्यें राहिल्यानें मनावर त्याचा फार वाईट परिणाम होतो. ब्रह्मी रंग शांत आणि पक्के असूनहि उदासीन नाहींत. त्यांच्यांत गर्भश्रीमंती जास्त असते.

माझ्या हृदयांत हिन्दुस्तानांतील कोणत्याहि पवित्र क्षेत्राइतकेंच मंडालेच्या किल्ल्याचें महत्त्व होतें. ज्या रत्नागिरींत ब्रह्मदेशाचा थीबा राजा कैदेंत होता त्याच रत्नागिरींत जन्मलेल्या लोकमान्य टिळकांना

इंग्रज सरकारनें सहा वर्षेंपर्यंत थीबा राजाच्या किल्ल्यांत डांबून ठेवलें होतें. याच भूमीवर 'गीतारहस्य' लिहिलें गेलें या विचारानें येथील हवा देखील 'कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम्' असें म्हणत असावी असें वाटत होतें. हिन्दु जातीच्या दुसऱ्या एका कर्मयोगी वीरालाहि सरकारनें येथेंच गाडलें. लजपतरायांच्या कारावासाची कहाणी ज्यांना आठवत असेल त्यांना सरदार अजितसिंह आणि लाला लजपतराय यांना येथें कशा रीतीनें ठेवलें होतें याचें स्मरण होईल. स्वराज्य मिळेपर्यंत येथें कोण जाणें अशीं किती तीर्थें स्थापन होतील !

मंडाल्यास दुसरेंहि पुष्कळ पाहिलें असेल, परन्तु आज कांहींच आठवत नाहीं. ब्रह्मदेशाची कारागिरी खूप वाखाणली जाते. तेथील सुतार आणि सोनार प्रख्यात आहेत. आम्हीं थोडेसें चांदीचें काम पाहिलें. जास्त पाहण्याची संधि आम्हांला मिळाली नाहीं. कुठें तरी एके ठिकाणीं मीं लिहिलें आहे कीं ब्रह्मी लोक हिऱ्यांचे शौकीन असतात. मात्र हे लोक हिरा अंगठीवर उलटा बसवितात. हिऱ्याची चपटी बाजू आंतल्या बाजूस ठेवतात आणि हिऱ्याची अणी बाहेर काढतात. जणूं काय किल्ल्याच्या दरवाजावरील मोठ्या डोक्याचे अणकुचीदार खिळेच. ब्रह्मी बटणेंहि अशींच असतात. वाटेंत आम्हीं एक वरात पाहिली. त्यांतील पुरुषांचे सदरे देखील सुन्दर इस्त्री करून राजप्रासादाच्या छपराप्रमाणें वळविलेले आणि टोंक काढलेले होते. त्यांत बरीच खुबी होती, आणि त्या पोशाखामुळें माणसें उठावदारहि दिसत होतीं. मंडालेच्या आजूबाजूचें दृश्यहि आपल्याला पसन्त पडेल असें आहे. येथून उत्तरेकडे गेलें कीं उत्तर ब्रह्मदेशाची जंगली शोभा सुरू होते. त्या बाजूस माणकांच्या खाणी आहेत असें आम्हीं ऐकलें.

*एकदां आमच्या डोक्यांत असा विचार आला कीं जलमार्गानें हिन्दुस्तानांत परत न जातां छिंदवीन नदीच्या कांठाकांठानें वर जाऊन तेथून मणिपुरास जावें आणि मणिपूरहून पूर्व बंगालमधून कलकत्त्यास पोहोंचावें. रस्त्यांत सदा रडणारी चेरापुंजीहि पाहतां येईल. रस्ता धोक्याचा आहे अशी सूचना नेहमींप्रमाणें आम्हांला मिळत होती. तिला आम्हीं जुमानलें नसतें. दहाबारा दिवस खूप मजा आली असती. परन्तु बरोबर छोटा गिरधारी होता. प्रवासाचे कष्ट जर तो सहन करूं शकला नाहीं तर तो आजारी पडावयाचा; आणि मग सुधारलेल्या जगापासून इतक्या दूर कसली मदताहि मिळूं शकणार नाहीं, या विचारानें आम्हीं आमचा उत्साह आवरला. महायुद्धाचे दिवस असल्यामुळें सरकारकडून कांहींतरी त्रास होईल ही शंकाहि होतीच.*

अनुक्रम ............
विभाग ...............
नों. दि.
शाखा.

# सुवर्ण देशाची माता

८

यात्रा करणाऱ्या माणसानें आधींपासूनच यात्रेच्या प्रदेशाविषयीं जितकी माहिती मिळवतां येईल तेवढी मिळविली पाहिजे, नाहींतर ज्याप्रमाणें गाईच्या चळांवर बसूनहि दूध सोडून रक्त पिणें गोचडींच्या नशिबीं असतें तशी स्थिति व्हावयाची. कुठें मुंबई प्रान्त आणि कुठें उत्तर ब्रह्मदेश! आम्ही मंडालेपर्यंत गेलों. तेथून अमरापुरालाहि गेलों. परन्तु माहितीच्या अभावामुळें तेथील प्रचंड बौद्ध मूर्ति पाहूं शकलों नाहीं; तेथें दोन मद्रासी विद्यार्थी रेशमाचें विण-

काम शिकत होते, त्यांनीं देखील आम्हांला कांहीं सांगितलें नाहीं. अमरापुरा इरावतीच्या कांठीं आहे. मला आंघोळीला जावयाचें होतें. परन्तु त्या विद्यार्थ्यांना तें आवडलें नाहीं. अखेर धर्मशास्त्र पुढें करून मीं त्यांना म्हटलें, 'नदीचें माहात्म्य नुसत्या दर्शनानेंच समाप्त होत नसतें. स्नान, पान आणि दान या तीन गोष्टी झाल्याशिवाय नदी आशीर्वाद देत नाहीं.' आणि मग आम्ही सगळेचजण स्नानास गेलों. नदीचा प्रवाह गजगतीनें चालतो. पात्र खूप रुंद आहे. आणि आसपासची भूमि देखील सपाट असल्यामुळें या ठिकाणीं नदी मोठी गंभीर दिसते.

इरावती कीं ऐरावती? मला असें वाटतें कीं नदीचें नांव इरा गवतावरून इरावती पडलें असलें पाहिजे. या नदीच्या कांठावरील पौष्टिक गवत खाऊन मदमत्त झालेल्या हत्तींना ऐरावत म्हणत असावेत. किंवा इंद्राच्या ऐरावतासारखी महाकाय आणि गजगतीनें चालणारी अशी ही नदी पाहून एखाद्या बौद्ध भिक्षूला वाटलें असेल, 'चला हिला आपण ऐरावतीच म्हणूं या!'

परन्तु ऐतिहासिक कल्पनातरंग चालविण्याचें काम बैठ्या लोकांचें आहे, प्रवाशाला तें परवडणार नाहीं.

ऐरावती जर हिन्दुस्तानांत असती तर संस्कृत कवींनीं तिच्या विषयीं ऐरावतीइतकाच रुंद आणि लांब काव्यप्रवाह वाहविला असता-ब्रह्मदेशांतील कवींनीं अनेक काव्यें लिहिलीं असलीं तरी आपल्याला काय माहीत असणार? ब्रह्मी आपली जन्मभाषा नाहीं, शास्त्रभाषा नाहीं किंवा राजभाषाहि नाहीं. शेजाऱ्याची भाषा शिकण्याइतकी प्रवृत्ति आपल्यांत आहेच कोठें मुळीं? एकाद्या इंग्रजानें ब्रह्मी भाषा

शिकून ब्रह्मी कविता इंग्रजींत आणून दिली कीं मग मात्र आपण ती कदाचित् वाचूं खरें !

कोणताहि देश ऐरावतीसारख्या नदीबद्दल गर्विष्ठ आणि कृतज्ञ होऊं शकेल. ब्रह्मदेशांत रंगूनहून उत्तरेकडे थेट मंडालेपर्यंत आम्ही रेल्वेनें गेलों होतों. तेथून जवळच्या अमरापुरास जाऊन आम्हीं ऐरावतीचें प्रथमं दर्शन घेतलें.

अशा नदीच्या पृष्ठभागावर होडींत किंवा वाफरां ( स्टीम लाँच )-मध्यें बसून प्रवास करणें हा जीवनांतील एक मोठाच सुखसोहळा आहे. समुद्रांतील प्रवास वेगळा आणि नदींतील प्रवास वेगळा.

नदींत लाटा असत नाहींत. दोन्ही बाजूचे कांठ आपली सोबत करतात. आणि आपल्याला असें वाटत नाहीं कीं आपण 'जीवन' हें नांव धारण करणाऱ्या परन्तु जीव घेणाऱ्या अशा एका महाभूताच्या तावडींत सांपडलों आहोंत. नदीचा प्रवास हा पृथ्वीच्या गोळ्याच्या अंतराळांत चालणाऱ्या सनातन व्योमविहाराइतकाच शान्त आणि आल्हाद-दायक असतो. आतां जेव्हां त्या ऐरावतीच्या प्रवासाचें मी स्मरण करीत आहें तेव्हां द्रौपदीसारख्या नर्मदेंतील चाणोदकर्नाळीकडील प्रवास, सीतेसारख्या तापींतील सागरसंगमापर्यंतचा प्रवास, काशी-तलवाहिनी भारतमाता गंगेचा प्रवास, मथुरावृन्दावनांतील कृष्णसखी कालिंदीचा प्रवास, काश्मीरच्या नंदनवनांत केलेला पार्वतीवित-स्ताचा प्रवास आणि वनश्रीचें माहेरघर अशा गोमान्तकांतील जल-प्रवास या सर्वांची एकदम आठवण येत आहे. त्यांतहि अगदीं मनमुराद लांब असा प्रवास म्हणजे वितस्ता आणि ऐरावती यांचाच होय. सिन्धु, गंगा, ब्रह्मपुत्रा आणि नर्मदा यांची बरोबरी करूं शकेल अशी ही नदी आहे. ऐरावतीचें पात्र व प्रवाह पाहतांच एकाद्या

महान् साम्राज्यावर राज्य करणारी अशी ही कोणी सम्राज्ञी तर नाहीं ना, असा विचार मनांत येतो. आराकान आणि पेगु योमा तिचें रक्षण करतात खरे, परन्तु ऐरावतीची प्रतिष्ठा राखण्यासाठीं ते आदरपूर्वक दूरदूरच उभे आहेत.

अमरापुराहून मंडाल्यास परत जाऊन आम्ही वाफरांत बसलों. आमचें जहाज निघालें. कामधेनूचीं वासरें सायंकाळ होतांच जशीं आईकडे धांवत यावींत तसे आसपासच्या विस्तीर्ण प्रदेशांतील श्रमजीवी कृषीवल ऐरावतीच्या कांठीं जहाजाजवळ गोळा होतात. आमचें जहाज म्हणजे एक मोठा चालताफिरता बाजारच म्हणावयाचा. लहान किंवा मोठें बंदर आलें कीं जहाज लोकांना आमंत्रण फुंकावयाचें. बस, मुंग्यांचें वारूळ फुटावें त्याप्रमाणें लोक धांवत येत. खाण्याच्या वस्तू, कपडे, वेताचीं भांडीं, कलाकुसरीच्या चिजा, नाना प्रकारचे पदार्थ जहाजावर पसरत. जहाजांत देखील कांहीं व्यापारी आपला माल घेऊन तयार होऊन बसलेले असावयाचेच. पक्ष्यांच्या किलबिलाटाप्रमाणें देण्याघेण्याचा गोंगाट सुरू होई. आपल्याला भाषा येत असेल तरच गोंगाटाचा कंटाळा यावयाचा. येथें लोक भांडोत, मारामारी करोत कीं रडोत, आपल्याला सगळेंच सारखें; जणूं काय एक मोठें नाटकच चालू असावें. विनिमय पुरा झाला कीं आमचें जहाज सुटावयाचें. विण्याच्या तयारींत असलेल्या म्हशीप्रमाणें आमचें जहाज डुलत डुलत चाललें होतें. जहाजावरील एका हलकट गोऱ्या अंमलदाराशीं आमचा थोडासा खटका उडाल्यामुळें आमच्या मुसाफिरीची सुरवात गोड्या पाण्यांतहि खारटपणें झाली होती. परन्तु मंदमंद वाऱ्यावर तें सर्व उडून गेलें आणि आम्ही देखील निसर्गाप्रमाणें प्रसन्न झालों.

नन्तर एक बंदर आलें. येथें व्यापार कांहीं विशेष चालत असावा. लहानमोठ्या असंख्य होड्यांचा कळप नदीच्या कांठीं चिखलांत लोळत पडला होता. ढोरांच्या पाठीवर माशा भणभणतात त्याप्रमाणें खेडेगांवांतील मुलें या होड्यांमधून नाचत बागडत खेळत होतीं.

ब्रह्मी लोकांत गोंदण्याचा शौक खूप आहे. त्यांच्या त्या केवड्याच्या रंगाच्या कातडीवर लाल आणि हिरवीं गोंदणें शोभतातहि. महाराष्ट्रांतील खेडेगांवांत अशी समजूत असते कीं या जन्मीं शरीरावर दागिने गोंदवून घेतले कीं पुढच्या जन्मीं सोन्याचे दागिने मिळतात, आणि कपाळावर टिकली आणि चंद्र गोंदण्यामुळें अखंड सौभाग्य मिळतें. येथील लोकांतहि अशीच कांहींतरी समजूत असली पाहिजे. कारण पुष्कळ खेडवळ लोक कमरेपासून घोट्यापर्यंतच्या सबंध भागावर नक्शीकाम केलेली लुंगी गोंदून घेतात. त्यामुळें कांहीं लोक नदींत उघड्यानें आंघोळ करीत होते तरी नागवे असल्यासारखें वाटत नव्हतें. जहाज जास्त वेळ थांबावयाचें असेल तेव्हां आम्ही किनाऱ्यावर जाऊन जवळच्या खेडेगांवांत फिरून येत असूं. ब्रह्मी घरें आणि गल्ल्या यांचा आमच्या डोळ्यांना सराव झाला होता. त्यांची भाषा आम्हांला येत नव्हती, तरीहि त्या निर्व्याज ग्रामीण लोकांचें जीवन आम्हांला परिचित असल्यासारखें वाटत होतें. मुत्सद्दी आणि व्यापारी लोकांचा रागद्वेष सोडून दिल्यास आणि धार्मिक किंवा अधार्मिक लोकांची कल्पनासृष्टि वगळल्यास मनुष्यजात ही सगळीकडे सारखीच असते. मला असें वाटतें कीं जगांतील खेडेगांवें आणि तेथील लोक सर्वत्र सारखेच असले पाहिजेत.

प्रवाहाबरोबर जणूं कांहीं ताल धरीत असावेत असे स्तूप आणि मंदिरें अधूनमधून येत असत. उंच टेकड्या आणि शिखरें माणूस-

जातीला नेहमींच प्रिय असतात. त्यांतहि पुन्हां नाईल नदीसारखी ऐरावती चारी दिशांना जेव्हां आपल्या कृपेचा उत्पात माजविते तेव्हां तर उंच उंच ठिकाणें हींच माणसाचीं आश्रयस्थानें होतात. त्या-संबंधींची आपली कृतज्ञता मनुष्य जर मंदिरें बांधून प्रगट करणार नाहीं तर ती दुसऱ्या कोणत्या रीतीनें व्यक्त होईल? निसर्गानें आपल्याला असें शिकविलें आहे कीं हिरव्यागार पानांमध्यें पिवळीं परिपक्व फळें आपली सगळी खुमारी दाखवूं शकतात. या धड्याचा फायदा घेऊन लोकांनीं झाडांमध्यें मंदिर बांधून त्यावर आकाशाचें आनंत्य दाखविणारीं सोन्याचीं बोटें उभीं केलीं आहेत. प्राकृतिक शोभा मनुष्य सुधारूं शकणार नाहीं असें मानणाऱ्यांनीं हीं शिखरें एकदां पाहिलीं पाहिजेत.

दुपारची वेळ होती. इंग्रजी जाणणाऱ्या एका ब्रह्मी कॉलेजियनशीं आम्ही बोलत होतों. इतक्यांत एक नीरव साद ऐकूं आली. छिंदवीन नदी आपला करभार घेऊन ऐरावतीच्या भेटीस आली होती. दोघींचा काय तो प्रेमसंगम! रामदास आणि तुकाराम एकमेकांना भेटले असावेत किंवा बुद्धिबळें ऐकणाऱ्या कालिदासाला भवभूति आपलें 'उत्तररामचरित' ऐकवीत असावा असा तो देखावा होता.

कल्पनेनें छिंदवीनच्या अज्ञात प्रदेशांतील शान राज्यांपर्यंत मी जाऊनसुद्धां आलों. हातांत तिरकमठा अथवा कुऱ्हाड घेऊन फिरणारे निश्चित नि निर्भय असे कितीतरी वनवासी तेथें मला भेटले. संशय आला तर जीव घेणाऱ्या आणि विश्वास बसला तर जीव देणाऱ्या अशा त्या प्रकृतीच्या बालकांचें दर्शन सुधारणेचा चिखल धुऊन काढणाऱ्या मंगलस्नानाप्रमाणें होतें. जहाजावरील पक्षी वाटेल तितका उडाला तरी शेवटीं जहाजावरच परत येतो; त्याप्रमाणें कल्पना

देखील जंगलाची सहल करून पुन्हां जहाजावर परत आली. कारण आम्ही आतां पकोकु बंदरावर येऊन पोहोंचलों होतों.

पकोकूजवळील चिखलानें भरलेल्या नदींत आंघोळ करून आणि ब्रह्मी पाहुणचाराचा स्वीकार करून आम्ही पुन्हां जहाजावर स्वार झालों. आणि रॉकेलच्या विहिरी पाहण्यासाठीं येननजांवपर्यंत जाऊन पोहोंचलों. येथें अमेरिकन मजुरांचें राज्य चालतें असें म्हणतां येईल. आजूबाजूस वनश्री नसल्यासारखीच. येथें एका बाजूस हें रॉकेलचें विहिरींचें आधुनिक क्षेत्र आहे आणि दुसरीकडे टेकडीवर असलेल्या छोट्याशा प्राचीन बौद्धमंदिराचें तीर्थक्षेत्र आहे. दोन्ही पाहून कितीतरी विचार मनांत आले. मंदिराच्या कारागिरींत हत्तीचें तोंड असलेला एक पक्षी कोरलेला होता. दुसरेहि असेच अनेक संकर येथें दिसले. जवळच्या मठांत कांहीं बौद्ध साधु घसा खरडून संध्याकाळची प्रार्थना किंवा असाच कांहींतरी विधि करीत होते. ऐरावतीच्या ठिकाणीं जणूं कांहीं कसलाच पक्षपात नसावा अशा प्रकारें तेलाच्या विहिरींवरील पंपांचा डोकें उठविणारा आवाजहि ती आपल्या हृदयावर वहन करते आणि अनिच्चा बत संखारा उप्पादव्ययधम्मिणो चा श्रान्त अथवा चिरन्तन संदेश देखील वहन करते. अमेरिकेचें सामर्थ्य खुशाल बेजोड असो, पण तें खंड तरी बाळकच म्हणतां येईल ना? जीवनाचें रहस्य त्याच्या हातीं इतक्यांत कोठून येणार? त्याला नदीच्या कांठीं तीन तीन हजार फूट ओल विहिरी खोदून घासलेट काढणेंच सुचावयाचें. जगांतील सर्व सृष्ट पदार्थ उत्पन्न होतात आणि नाश पावतात, येथें सर्वच नश्वर आणि व्यर्थ आहे, असार आहे, सार फक्त यांमधून सुटून निर्वाण मिळविण्यांत आहे, ही गोष्ट कोणता अमेरिकन

स्वीकारूं शकेल ? पण ऐरावती नदी उत्साहामुळें ज्ञान नाकारणार नाहीं आणि ज्ञानाच्या भारानें उत्साह घालवून बसणार नाहीं. तिला तर महासागरांत विलीन व्हावयाचें आहे, आणि शिवाय हा विलीन होण्याचा आनंद अखंड चालवावयाचाहि आहे.

येननजांवहून आम्ही प्रोमपर्यंत गेलों आणि तेथें ऐरावतीचा निरोप घेतला. येथून पुढें गेल्यावरहि दीर्घिका अनेक मुखांनीं सागराला मिळते. ऐरावती खरोखर सुवर्ण देशाची माता आहे.

# पकोकु—

१

बंदरावर गाड्या तर पुष्कळ होत्या. पण आम्हांला कोण शहरांत घेऊन जाणार? माणसाची भाषा आम्हांला कुठें बोलतां येत होती? आमचें जहाज दुपारपासून रात्रीपर्यंत पकोकूंत आराम करणार होतें. एवढ्या वेळांत आम्हांला पकोकूचा प्रसाद चाखावयाचा होता. येथील सेशन्स जज्जास लिहिलेलें आमच्याजवळ एक शिफारसपत्र होतें. ते भेटले नाहींत तर शहरांत ऊपोसिन नांवाच्या दुसऱ्या एका सद्गृहस्थांकडे जातां येण्यासारखें होतें. आमच्या भाषेंत आम्ही प्रत्येक

गाडीवाल्यास विचारलें. आमची भाषा कोणती हा कांहीं महत्त्वाचा प्रश्न नाहीं. आमच्या जवळ हिन्दी, मराठी, कानडी, गुजराती, बंगाली, सिंधी, इंग्रजी, फारसी, आणि संस्कृत इतक्या भाषांचा साठा असून-हि येथें त्यांपैकीं एकहि चालण्यासारखी नव्हती. अखेर एका एक्के-वाल्यानें डोकें हलवून आमचें सामान आपल्या ताब्यांत घेतलें. आम्ही त्याच्या गाडींत जाऊन बसलों. प्रथम जज्जसाहेबांच्या बंगल्याकडे गेलों. एका कागदावर इंग्रजींत आमचीं नांवें लिहून गाडीवाल्याला धाडून दिलें. थोडय़ा वेळांत गाडीवान परत आला. खुणेनें त्यानें सांगितलें, ' तेथें कोणी नाहीं, बाहेरगांवीं गेले आहेत. ' आमचीं नांवें आमच्या हातांत परत आलीं.

आम्ही पुन्हां निश्चय करून गाडीवानाला सांगितलें, ' ऊ पो सिन ! ' गाडी निघाली, आणि शहरांतील एका प्रतिष्ठित घरासमोर येऊन उभी राहिली. गाडीवाल्यानें आमचें सामान उतरून घरांत नेऊन ठेवलें. आम्ही आंत गेलों. घरांतून दोन तीन स्त्रिया बाहेर आल्या. आम्हांला संकोच वाटला. आम्हीं म्हटलें, ' ऊ पो सिन, गमनाजी. ' ( गमनाजी हा एक हिन्दुस्तानी व्यापारी अडती होता. त्याचा पत्ता या घरचा होता. ) बायांनीं आम्हांला बसावयास सांगितलें. आम्ही वाट पाहूं लागलों. बाया आंत निघून गेल्या. आम्ही अर्धा तास बसलों असूं. ऊ पो सिन हि येईना किंवा गम-नाजीहि येईना. आम्हांला चमत्कारिक वाटलें. असें कुठवर बसा-वयाचें ? जीवतरामनां मीं म्हटलें, ' तुम्ही येथें बसा. मी गांवांत फिरून येतों. कोणी आपली भाषा जाणणारें भेटलें तर ईश्वराची कृपा. ' फेरीवाल्याप्रमाणें सबंध गांवभर भटकलों. माझ्या भाषेंत मी विचारीं. लोक आपल्या भाषेंत उत्तर देत. पण त्याचा बोध मात्र

आसपासच्या हवेलाहि होत नव्हता. जणूं बहिऱ्या लोकांचा मुलूख. एके ठिकाणीं घरावर फोटोग्राफिक कॅमेऱ्याचीं चित्रें चिकटविलेलीं मला दिसलीं. हुश्श ! आतां तरी कोणी इंग्रजी बोलणारें मिळेल. मी दुकानांत गेलों आणि माझें इंग्रजी तेथें ओतलें. पण येथें देखील उत्तेजक प्रतिध्वनि निघाला नाहीं.

निराश होऊन मी मुक्कामावर परत आलों. गिरधारीला म्हटलें, 'पळत जा, आणि त्या तिकडे आपला गाडीवाला दिसत आहे तो अदृश्य होण्यापूर्वी त्याला घेऊन ये.' गाडीवाला आला. आणि आम्ही सामान गाडींत ठेवूं लागलों. घरच्या बायांनीं हें पाहिलें. आलेले पाहुणे आतिथ्य घेतल्याशिवाय जात आहेत याचें त्यांना वाईट वाटलें. त्यांची भाषा आम्ही समजूं शकत नव्हतों, पण त्यांच्या डोळ्यांमधून झरणारें आतिथ्य वाचण्यास उशीर लागला नाहीं. त्यांनीं आम्हांला खूप समजाविलें. आम्हीं पण त्यांना सांगितलें कीं 'आलेल्याच जहाजांतून आज संध्याकाळीं आम्हांला परत जावयाचें आहे. फारसा वेळ राहिलेला नाहीं.' पण आम्ही जें एवढें सगळें बोललों तें फक्त आमच्या समाधानासाठींच. बाया थोडेसें बोलत आणि आंत जात. एकाद्या म्हातारीला घेऊन येत. ती कांहीं तरी बोले आणि दुसऱ्या दरवाजानें परत जाई. थोड्या वेळानें शेजारच्या दोन म्हाताऱ्या आल्या. त्यांनीं पण आपली भाषा अजमावली. आम्हांला खुळ्यासारखें वाटत होतें. असें अचानक यावयाचें आणि तसेंच्या तसेंच परत जावयाचें हा अशिष्टपणा खरा, पण करावयाचें काय ? गाडी हातची जावूं द्यावी तर बंदराचा रस्ताहि आठवत नव्हता. आणि लोकांना विचारावें तर तें कोणत्या भाषेंत ? म्हणून डोळ्यांनींच माफी मागून आम्ही गाडींत बसलों.

घडघडघड गाडी चालूं झाली, आणि घरांतील बायकांनीं कलकलाट करून सोडला. आम्ही थोडेसे दूर गेलों इतक्यांत हंगेरियन टोपी घातलेला एक मनुष्य समोरून येत असलेला आम्हांला दिसला. स्वदेशी भाषा समजणारें एखादें नररत्न आम्हांला भेटेल अशी आशा देखील मनांत उरली नव्हती. तरी पण त्याला गाडीजवळून जात असलेला पाहून मी मंत्र फेंकला, 'गमनाजी' माणूस चमकला. परत फिरला. आमच्यांतहि हिम्मत आली. मानवी भाषेचा आश्रय घेऊन आम्हीं विचारलें, 'आप गमनाजी है?' त्यांनीं 'हो' म्हटलें. मग काय विचारतां? गाडी परत फिरली. आम्ही ऊ पो सिनच्या घरीं पुन्हां गेलों. बायकांना खूप समाधान वाटलें. गमनाजींनीं थोडीशी दिलगिरी प्रदर्शित करून सांगितलें कीं ते स्वतः स्वयंपाक करूं शकत नाहींत, मिठाईवरच चालवून घेतात. आम्हीं म्हटलें, 'आम्हांला जर अन्नाहार मिळेल तर तो ब्रह्मी हातचा चालेल. ब्रह्मी लोकांच्या हातचें कोणत्याहि जातीचा हिन्दु खात नाहीं, हें आम्हांला माहीत आहे. पण आम्हांला ब्रह्मी जेवण चाखावयाचें आहे. त्यांत निषिद्ध असें कांहीं येणार नाहीं, एवढी जर खात्री तुम्ही देत असाल तर या घरचें देखील आपण खाऊं.'

तुटलेली तार सांधली जावी त्याप्रमाणें घरच्या माणसांशीं आमचें बोलणें सुरू झालें. 'काय खाल काय नाहीं' हें सर्व त्यांनीं विचारून घेतलें. आम्हांला अन्नांत खपणारा शुद्ध, साधा, ब्रह्मी आहार हवा होता.

जेवण तयार होईपर्यंत आंघोळ आटोपून घेण्याचा मीं विचार केला. वास्को डी गामाप्रमाणें मी 'गुड होप' पर्यंत फिरलेला होतों. यामुळें नदी—ऐरावतीला मिळणारी एक लहानशी नदी—कोणत्या

दिशेस आहे हें मला माहीत होतें. कपडे घेऊन नदीवर गेलों. नदी चिखलानें लालभडक दिसत होती. परन्तु घामापेक्षां चिखल बरा या न्यायानें मी पाण्यांत पडलों. जीवतराम, गिरधारीहि आले. आंघोळ करून आम्ही जेवावयास बसलों. ब्रह्मी पद्धतीची मांडी घालून आम्ही बसलों. वेताच्या सुन्दर लाखी भांड्यांत वाढलेले भात, वालाची उसळ आणि दुसरे कितीतरी पदार्थ आम्हीं खाल्ले. आहार आवडला असें कांहीं म्हणतां येत नाहीं; पण होता मात्र स्वच्छ आणि चांगला शिजलेला. नन्तर घरच्या म्हातारीनें ऊ पो सिन, त्याचा भाऊ आणि घरचीं कांहीं माणसें यांच्या प्रकृतीविषयीं आणि प्रवृत्तीविषयीं थोडेसें सांगितलें. 'घरीं कोणी नाहीं. यामुळें तुमच्या योग्य तुमचें स्वागत आम्ही करूं शकलों नाहीं.' म्हणून दिलगिरीहि व्यक्त केली.

आमच्यामार्फत जज्जसाहेबांची ओळख झाली तर बरें असें गमनाजींना वाटल्यामुळें ते आम्हांला त्यांच्या बंगल्यावर घेऊन गेले. जज्जसाहेब फिरनीवर गेले होते. आम्ही आमच्या भल्या यजमानाचे आभार मानून जहाजावर परत आलों.

# घासलेटच्या विहिरी १०

ब्रह्मदेशाचें खरें दर्शन आम्हांला येननजांवांत झालें. येथें घासलेटच्या प्रख्यात विहिरी आहेत. घासलेटच्या मागोमाग इंग्रज व्यापारी आणि अमेरिकन मजूर हे यावयाचेच. आम्ही येननजांवास पोहोंचलों तेव्हां दुपारची वेळ झाली होती. बंदरापासून शहर थोडें दूर होतें. जीवतराम माझा लोटा बंदरावर विसरून आले. अर्ध्या वाटेंत आठवण होतांच तो आणण्यासाठीं ते स्वतःच परत गेले. आम्ही मुक्कामावर जाऊन पोहोंचलों. कितीतरी वेळ झाला पण जीवतराम कांहीं येईनात. छोटा

गिरधारी घाबरला आणि रडकुंडीस आला. मी म्हणालों, 'थांब हं, मी जीवतरामनां शोधायला जातों. तोंपर्यंत तूं येथेंच बैस!' अनोळखी मुलखांत गिरधारी मला सोडून एकटाच कसा बसणार? 'संकटा-पेक्षां त्याचा उपाय असह्य' व्हावा तसें गिरधारीला झालें. तो मला म्हणाला, 'तुम्ही मुळींच जाऊं नका!' मी त्याची स्थिति समजलों. त्याला घेऊन मी रस्त्यावर आलों आणि त्याचें ध्यान गप्पांमध्यें गुंतवलें.

अखेर एकदांचे जीवतराम आले. आम्ही जेवलों आणि घास-लेटच्या विहिरी पाहण्यास निघालों. ताबुतासारखे पवनचक्कीचे लोखंडी पिंजरे प्रत्येक विहिरीवर दिसूं लागले. या विहिरी फार जवळजवळ आहेत. त्या किती खोल असतील याची तर आम्हांला कल्पनाहि येणें कठीण होतें. यंत्राच्या द्वारें विहिरीमधून तेल काढलें जात होतें. औषधासाठीं बैलांचें रक्त शोषून घेतलें जातें तसें दिव्यासाठीं पृथ्वीचें रक्त शोषून घेण्याचें काम येथें चालू होतें. एक एक विहीर दोनदोन तीन तीन हजार फूट खोल. तीस किंवा चाळीस फूट खोल विहीर झाली कीं आपण म्हणतों, 'अरे बापरे! या विहिरींत डोकावल्यानें घेरीच याव-याची!' तीन हजार फूट खोल विहीर म्हणजे काय याची कल्पना करणेंहि कठीण आहे. आंत डोकावून पाहण्याची हिम्मत केली असती तरी तशी सोय नव्हती. विहिरींचीं तोंडें फळ्यांनीं बंद केलीं होतीं. फक्त पंपिंगच पहावयास मिळालें. शोषून काढलेलें तेल जवळच्या एका मोठ्या घरांत गोळा होत होतें. विहिरी पाहिल्यानन्तर आम्ही तेथें जाणार होतों. विहिरींच्या या वनांत एकुलती एक विहीर देशी पद्धतीनें चालत होती. ही विहीर अगदींच उथळ होती. फक्त पांचशें फूट खोल! ब्रह्मी मजूर दोरीचे टोंक पकडून धावत जात आणि

अशुद्ध घासलेटची बादली भरून वर येई. आमच्या बरोबरच्या आमच्या गृहपतीनें सांगितलें, ' येथें खेडेगांवांतील लोक विहिरींतील माती पणतींत भरून ठेवतात. रात्र झाली कीं माती पेटवून द्याव-याची. सबंध रात्रभर ती भक भक भक जळत राहते. माती निस्तैल झाली कीं फेंकून देतात आणि दुसरी स्नेहाळ माती भरून ठेवतात.' या विहिरींत मीं डोकावून पाहिलें. आगगाडीच्या बोगद्यांत जसा दिसतो तसा गाढ अंधार आंत भरलेला होता. बाहेरील प्रकाशामुळें आंतील दिसत नसावें असें समजून मी माझ्या हातांतील पुस्तकाची पुंगळी बनवून दुर्बिणीप्रमाणें धरून आंत नजर फेकली. डोळे फाडफाडून आंत पाहिलें. पण नुसत्या दाट काळोखाशिवाय कांहींच दिसलें नाहीं.

विहिरींसंबंधीं जितकी माहिती मिळूं शकली तेवढी विचारून घेतली आणि आम्हीं एंजिन–घरांत गेलों. तेथें विहिरींतून काढलेलें घासलेट जमा करून येथून रंगूनपर्यंत पंप करण्यांत येतें. येननजांव-पासून रंगूनजवळील एका बेटापर्यंत मोठाले नळ टाकलेले आहेत. येथपासून जवळजवळ तीनशें मैलपर्यंत तेल आपल्या पायांनीं धांवत जातें. नंतर त्या बेटांत तें घुसळण्यांत येतें आणि त्याची शुद्धि होते. तेल आणि पाणी यांचा मेळ बसत नाहीं असें आपण अनुभवावरून म्हणूं शकतों. पण हें केवढें आश्चर्य कीं घासलेटच्या विहिरी मोठमोठ्या नद्यांच्या कांठींच सांपडतात !

येथून आम्ही मुक्कामाच्या ठिकाणीं परत निघालों. रस्त्यांत नाना-प्रकारचे विचार चालले होते. येथें काम करण्यासाठीं अमेरिकेचेच मजूर कां येतात ? जगांतील मजूर म्हणजे गरिबांची एक विराट जात. वाटेल तेथें गेले तरी त्यांच्या नशिबीं पोटाएवढी किंवा कमीच भाकरी असावयाची. तरीदेखील या लोकांत सुद्धां वर्णद्वेष आणि

जातीय स्वार्थ हीं आहेत. अमेरिकन मजुरांचा असा नियम आहे कीं ते इतर लोकांना या धंद्यांत शिरूं देत नाहींत; दुसऱ्या गोऱ्या लोकांनाहि नाहीं. असा कडक नियम करणारी जनता किती चलाख आणि दुष्ट किंवा स्वार्थी असली पाहिजे! जेथें जो माल मिळेल त्याच्यावरच उपजीविका चालविण्याचा जुना जमाना आतां गेला. आतां जेथून जी वस्तु मिळेल तेथून ती आणून वापरावयाची असा काळ आला आहे. लहानपणीं रात्रीच्या वेळीं अभ्यास करतांना नकाशांत बाटूम कुठें आहे हें पाहण्यासाठीं मी बाटूमचेंच घासलेट वापरलें होतें. त्या दिवसापासून विचार करीत आलों आहें कीं, 'सगळ्या जगांतले पदार्थ गोळा करण्याचें माणसाला कसें सुचलें असेल?' आगकाडीचें लाकूड स्वीडनच्या जंगलांतून येतें. कंदील ऑस्ट्रिया आणि जर्मनीमधून. आंतील तेल कास्पियन समुद्राच्या किनाऱ्यावरून. बत्ती विलायतेंतून. नकाशा ब्रिटनमधून. पुस्तकांचा कागद कदाचित् इटलींतून. इतका सरंजाम गोळा व्हावयाचा तेव्हां माझें वाचन चालावयाचें!' त्यावेळीं ही स्थिति वाईट आहे असें न वाटतां उलट इंग्रजांच्या उद्यमाचें आणि आपल्या नशिबाचें मी कौतुकच करीत होतों.

येथील जंगलांतील इमारती लांकडें, शेतांतील तांदूळ, खाणींतील माणकें, आणि पृथ्वीच्या पोटांतील घासलेट या सर्वांमुळें प्राचीन ब्रह्मदेश अगदीं उघडा पडला आहे. रस्त्यावरील चिंचेला जसे दगड आणि काठ्या खाव्या लागतात तशी ब्रह्मदेशाची दशा झाली आहे. ब्रह्मदेश हा गोऱ्या लोकांना गुळाच्या ढेपेप्रमाणें झाला आहे. हिन्दु लोक जसे सामाजिक क्षेत्रांत गोऱ्यांना दूर ठेवतात तसें ब्रह्मी लोकांचें नाहीं. गोरे लोक ब्रह्मदेशांत लग्नहि करूं शकतात. आम्ही

*असें ऐकलें कीं गोरे लोक जेव्हां हा देश सोडून परत जातात तेव्हां आपल्या ब्रह्मी स्त्रीला व तिच्या मुलाबाळांना थोडासा पैसा देऊन येथेंच सोडून जातात !*

## येननजांव ११

रात्रीं आम्हांला जेवावयाचें नव्हतें. चांदणी रात्र असल्यामुळें आम्ही गांवांत फिरावयास निघालों. तेथें एका लहानशा टेकडीवर एक बौद्ध मंदिर पाहिलें. 'मंदिरांतील लाकडाचें कोरीवकाम असाधारण सुन्दर होतें. येथील शिल्पकार पुराणकाराप्रमाणें प्रतिभासम्पन्न असले पाहिजेत. एका खांबावर हत्तीचें तोंड असलेला एक पक्षी कोरलेला होता. दुसरेहि असे अनेक संकर येथें आढळले. टेकडीवरून चांदण्यामध्यें आसपासचें दृश्य जादूनें भारलेलें वाटत होतें; जणूं-

काय कादंबरींतील एकाद्या अपूर्व मुलखांत मंतरलेल्या घोड्यावर बसून आले असावेत.

परत येतांना एक बौद्ध मठ दिसला. आम्हीं दरवाजांतून डोकावून पाहिलें. कांहीं बौद्ध साधु उच्च स्वरानें संध्याकाळची प्रार्थना किंवा असाच कांहींसा विधि करीत होते. जीवतरामनां त्यांत रोमन कॅथोलिक पूजाविधीचें साम्य दिसलें. तेव्हां आम्ही ख्रिस्तीधर्म आणि बौद्धधर्म यांच्या संबंधाविषयीं चर्चा करूं लागलों. गिरधारी अधून मधून कांहीं प्रश्न विचारीत होता. पण ज्याप्रमाणें वाचण्याच्यावेळीं डोळ्याच्या पापण्या हलल्या तरी वाचनांत खंड पडत नाहीं त्याप्रमाणें गिरधारीच्या प्रश्नां-मुळें आमच्या चर्चेंत विक्षेप पडत नव्हता. बुद्ध भगवानांनीं आपल्या शिष्यांना चारी दिशांना जाऊन कल्याणाच्या मार्गाचा उपदेश कर-ण्याची आज्ञा केली होती. अशोकानें बौद्ध भिक्षूंना दूरदूरच्या देशांत धाडलें होतें. लंका, ब्रह्मदेश, सत्यपुत्र वगैरे या बाजूच्या आणि कांबोज, इराण वगैरे पश्चिमेकडील देशांतील अंतिओकाच्या राज्यापर्यंत बौद्ध भिक्षु पोहोंचले होते. एसीच्या पंथावर बौद्धधर्माची छाप स्पष्ट दिसून येते. आणि जर एसीच्या पंथामधून ख्रिस्तीधर्मानें बरेचसें घेतलें असेल तर ख्रिस्ती धर्म हा बौद्ध धर्माचा प्रशिष्य म्हणतां येईल. येशूची प्रेममय अहिंसावृत्ति, त्याची परलोक परायणता आणि त्याचा गूढवाद हे आपल्याला थोडे देखील अपरिचित वाटत नाहींत. याचें कारण ती आर्य भावनेचीच एक स्वतंत्र वसाहत आहे हें असूं शकेल काय ? मि. अँड्र्यूझ यांना देखील असें वाटत होतें कीं बौद्ध आणि ख्रिस्ती धर्मांचे संबंध आणि सामर्थ्य हीं आकस्मिक नाहींत.

अथवा असेंहि असूं शकेल कीं सगळें खुदापरस्त (ईश्वरपूजक) पैगंबर (ईश्वरी सन्देशवाहक) जें म्हणतात तें तत्त्वतः एकच असतें,

पण प्रत्येक समाजांतील माणसें त्याचा आपापल्या पद्धतीनें स्वीकार करतात. यामुळें हे पैगंबर जेव्हां आपला देश आणि समाजांतील प्राचीन समजुती व विधी यांच्या अधीन होतात आणि त्या सर्व गोष्टी देखील आपल्या धर्मांत सामील करून घेतात तेव्हांच भेद निर्माण होतो. पण या दोन तत्त्वांना कोण वेगळें करूं शकणार? बहिश्त ( स्वर्ग ); दोझख ( नरक ); कयामत ( प्रलय ) आणि कुर-बानी ( बलिदान ) या विषयींच्या समजुती सोडून देणें इस्लामाला परवडेल काय? तरीपण आपल्याला महंमदसाहेबांची अनन्य ईश्वर-निष्ठा आणि अनाथाविषयींची कळकळ, त्यांचा अलअमीनपणा हेंच अत्यंत आकर्षक वाटतें.

बौद्ध साधूंची प्रार्थना संपली आणि आमची चर्चा देखील तेथेंच थांबली. ब्रह्मदेशांत मुसलमानांची संख्या बरीच आहे. हिन्दूंप्रमाणें ते येथील लोकांपासून वेगळे राहात नाहींत. ब्रह्मी लोकांशीं त्यांचा रोटीबेटीव्यवहार चालतो.

पाश्चात्य पोषाख वापरल्यानें जशी आपली कातडी पाश्चात्य होत नाहीं त्याप्रमाणें पाश्चात्य व्यापाऱ्याच्या अर्थशास्त्राच्या कचाटींत सांपडल्यानें आणि पाश्चात्य शिक्षणानें थबथबल्यानें देखील आपली जीवनाविषयींची निष्ठा ( View ) आणि आपले हृदयभाव हे कांहीं अगदींच बदलून जात नाहींत. वासलेटचा एवढा मोठा कारखाना येथें चालतो, देशोदशींचें व्यापारीच काय पण मजूर सुद्धां येथें येऊन राहतात, दारू पिऊन कधीं कधीं गोंधळ माजवितात, तरीपण ब्रह्म-देशाचें थंड जीवन जरासुद्धां गरम होत नाहीं. जुनी आबादी नष्ट होईल, पोट भरण्याची मारामार होईल, दारूचे गुत्ते आणि निवड-णुकीची दारू खेड्यापाड्यांत जाऊन पोहोंचेल, जुने रिवाज बदल-

तील, वर्णसंकरामुळें सामाजिक कायद्यांतेहि फेरफार करावा लागेल, आणि तरीहि ब्रह्मदेशाचें ब्रह्मीपण कायमचें राहील—असें येथील मठाची घाट पुनःपुन्हां ऐकवीत होती.

हिन्दुस्तानांत जोंपर्यंत परराज्य, दुष्काळ आणि रोग आहेत तोंपर्यंत मिशनऱ्यांना या देशांत स्थान आहे, हें जितकें खरें आहे तितकेंच हेंहि खरें आहे कीं जोंपर्यंत ब्रह्मी लोकांना शिक्षणाची जरूर आहे तोंपर्यंत बौद्धधर्म या देशांत रहावयाचाच; कारण बौद्ध पुंगी हे ब्रह्मी समाजाचें खमीर ( जीवनसत्त्व ) आहे. जातीच्या अभिमानामुळें हिन्दुस्तानांतील ब्राह्मण जसे आपलें कर्तव्य विसरले आहेत तसे ब्रह्मदेशांतील पुंगी अजून विसरले नाहींत. पुंगी सकाळीं उठून आपलीं कषायचीवरें धारण करून भिक्षा मागावयास जातात. विशिष्ट आकाराचीं आपलीं भिक्षापात्रें दोन्ही हातांनीं पोटाजवळ धरून शांतपणें व रांगेनें ते घरोघर जातात, व जें कांहीं मिळेल तें खातात. त्यांच्या डोळ्यांत आपल्याकडील भटांचा लोभी कोडगेपणा दिसत नाहीं. पिंडपातानंतर ते सगळा वेळ अध्ययन आणि अध्यापन यांत घालवितात. आपल्या येथील गृहस्थाश्रमी ब्राह्मण आणि अशिक्षित संन्यासी यांना पुष्कळ वेळां धर्म माहीतच नसतो. आपलें जीवन समाजाच्या धर्मसेवेसाठीं आहे ही गोष्ट ते विसरून गेले आहेत. ब्रह्मदेशांतील सगळे पुंगी धर्मावतार आहेत असें म्हणण्याचा आशय नाहीं; परन्तु ती संस्था अजून आपला धर्म आणि आपली प्रतिष्ठा विसरलेली नाहीं, एवढेंच सांगावयाचें आहे.

मंडाल्यासच आम्हीं पाहिलें होतें कीं मुलें जरा मोठीं झालीं कीं पुंगींच्या मठांत शिकण्यास जातात. आपल्या येथें ज्याप्रमाणें ब्राह्मणाचा मुलगा अमुक वयाचा झाला कीं यज्ञोपवीत घेऊन द्विज

बनतो, त्याप्रमाणें ब्रह्मदेशांतील बौद्ध बालक संस्कार घेऊन प्रथम पुंगी म्हणजे संन्यासी होतो. आपल्याकडे ज्याप्रमाणें मुलाचें लग्न करून देण्याचें कर्तव्य आपलें आहे असें आईबाप समजतात, त्याप्रमाणें बौद्ध सामाजिक आदर्श हें नक्की करतो कीं मुलाला निर्वाणाचा म्हणजे त्यागवैराग्याचा मार्ग दाखविणें हें आईबापांचें मुख्य कर्तव्य आहे. मुलगा पुंगी होऊन विद्याध्ययन करतो. पुढें जर मोक्षधर्मावरील त्याची श्रद्धा दृढ झाली तर तो कायमचा पुंगी होऊन जातो, नाहींतर स्वेच्छेनें गृहस्थधर्म स्वीकारतो. लग्न करून देण्याची जबाबदारी आईबापांची नाहीं. आईबापांनीं धर्माचा उत्कृष्ट मार्ग मुलाला दाखवून दिला कीं त्यांचें काम संपलें.

आपल्या येथील सामाजिक आदर्श याहून भिन्न आहे. गतानुगतिक गृहस्थधर्मांत मुलांना दाखल करण्याचें काम आईबापांचें आहे असें समजलें जातें. तें नाकारून नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळणें किंवा गृहस्थधर्मांतून बाहेर निघून संन्यास घेणें हें त्या त्या व्यक्तीच्या संकल्पावर आणि पुरुषार्थावर सोडण्यांत येतें. आश्रमादाश्रमं गच्छेत् । जसा अधिकार असेल तसें स्थान मनुष्य मिळवील. अधिकाराशिवाय संन्यासाची दीक्षा देणें हें अधःपाताला आमंत्रण देण्यासारखें आहे. एकदां पाऊल पुढें टाकल्यावर मागें फिरतांच कामा नये. यांत चारित्र्यहानि आहे. खुशाल हळू चाला, पण माघार घेऊं नका. असंख्य लोक ज्या रस्त्यानें जाऊं शकत नाहींत त्या रस्त्याची दीक्षा देणें यांत कितपत यथार्थता आहे ?

दोन्ही दृष्टींचा अन्तिम उद्देश एकच आहे. दोहोंत तथ्य आहे. तरीहि किती मोठा फरक !

# प्रोम

# १२

*येननजांवपासून प्रोमपर्यंत जाऊन आम्हीं ऐरावतीचा निरोप घेतला. रस्त्यांत एक बंदर लागलें. त्याचें नांव आठवत नाहीं. तेथें महायुद्धाचे कैदी ठेवण्यांत आले होते. बंदरावर कांहीं शीख शिपाई गोळा झाले होते. त्यावरून आम्हांला माहीत झालें कीं कोणी दगाफटका करूं नये म्हणून येथें खास बंदोबस्त ठेवण्यांत येतो.*

*प्रोममध्यें प्रेक्षणीय असें कांहीं नाहीं असें आम्हांला सांगण्यांत आलें. आम्ही देखील परत फिरण्यास कांहींसे अधीर झालों होतों.*

आमच्या गृहपतीनें रात्रीं आम्हांला प्रोमचे रस्ते आणि बाजार पाहण्याचा आग्रह केला. बाजाराच्या एका भागांत 'नप्पी'च्या वखारी होत्या. नप्पी हें ब्रह्मी लोकांचें एक स्वादिष्ट खाद्य आहे. एक खास प्रकारची मासळी शेवाळांत लपेटून जमिनींत पुरून ठेवतात. तेथें ती चांगली सडून गेली कीं मग खाण्यालायक समजली जाते. या आहारामुळें कित्येक लोक रोगाच्या आहारीं जातात, तरीहि ब्रह्मी लोक त्याचा त्याग करीत नाहींत ! त्या वखारीजवळून जातांना नाक पकडून श्वास रोकून जावें लागलें. त्यांतूनहि जी थोडीशी दुर्गंधी डोक्यांत घुसली ती लवकर बाहेर निघाली नाहीं. पुष्कळसे परदेशी लोक ब्रह्मी लोकांना नप्पीमुळें बदनाम करतात. या बाबतींत ब्रह्मी लोकांचें म्हणणें काय आहे तें आपल्याला माहीत नाहीं. एका हिन्दी मित्रानें सांगितलें, ' जर आपण एकाद्या ब्रह्मी गृहस्थाच्या शेजारीं रहात असलों आणि जर आपण आपल्या घरीं तेलांत कांहीं तळलें तर ती ' घाण ' ब्रह्मी माणसाला सहन व्हावयाची नाहीं. शेजारी कितीहि थंड डोक्याचा असला तरी अशा प्रसंगीं गरम हा व्हावयाचाच, आणि आपल्याला कमींत कमी दोन चार ' बातें सुनवावयाचाच. ' भिन्नरुचिर्हि लोकः ।' दुसरें काय !

या सर्व ऐकलेल्या आणि वाचलेल्या गोष्टी आहेत. प्राचीन काळापासून प्रवासी लोक वेगवेगळ्या देशांना बदनाम करीत आले आहेत. ग्रीक ग्रंथकार पहा किंवा मार्को पोलोचीं वर्णनें वाचा, आपल्या संस्कृत ग्रंथांना विचारा किंवा मिशनऱ्यांचीं वर्णनें तपासा, परदेशाविषयीं बेजबाबदार विधानें करण्यांत प्रत्येकाला सारखीच गंमत वाटते. ज्यानें बंधुभाव राखला पाहिजे, जो संस्कारांच्या विनिमयाचा परराष्ट्रीय वकील आहे, संधिकारी प्रेषितासारखी ज्याची पदवी, तोच

जेव्हां आपलें महत्त्व वाढविण्यासाठीं, श्रोत्यांचें कुतूहल तृप्त करण्यासाठीं, ज्यांच्यामुळें गैरसमज निर्माण होईल अशीं वर्णनें खुलवून सांगतो किंवा काल्पनिक प्रसंग तयार करतो तेव्हां मोठ्या दुःखानें असें म्हणावें लागतें कीं संस्कृतीचें मुख्य साधन असंस्कारी लोकांच्या हातीं जाऊन शापरूप ठरलें आहे. कोणत्याहि देशाची संस्कृति, त्याच्या समजुती, त्यांची राहणीकरणी, हें सर्व जाणण्यासाठीं आणि तपासण्यासाठीं त्या देशाचा खूप परिचय असला पाहिजे. आणि परिचय तर प्रेमाशिवाय, समभावाशिवाय होणें शक्यच नाहीं.

त्याच रात्रीं आम्हीं प्रोम सोडलें. गाडी उशीरां सुटणार असावी, आम्ही लवकर जाऊन गाडींत झोंपलों. अर्धवट झोंपेंत तिकिट कलेक्टर आणि गार्ड यांच्यामधील संवाद मीं ऐकला. आमचा डबा पहिला असल्यामुळें एंजिनाला जोडलेला होता.

'तुम्हांला माहीत नाहीं काय कीं प्रवाशांचा डबा एंजिनला जोडावयाचा नसतो?'

'त्यांत काय बिघडलें?'

'तें कायद्याच्या विरुद्ध आहे. कायद्यांत असें लिहिलें आहे कीं एंजिन आणि मुशाफिर यांच्या दरम्यान मालाचे डबे राखले पाहिजेत. एखादा अपघात झाल्यास मालाचे डबे मोडले तरी हरकत नाहीं पण माणसें तरी वांचावींत.'

'जाऊं द्या हो, असे कुठें रोज रोज कां अपघात होत असतात?'

'तर मग अपघात काय सांगून येतात?'

संवाद बराच वेळ चालला होता. खवळलेल्या समुद्रांतून प्रवास करतांनाहि जी शंका माझ्या मनांत आली नाहीं ती या संवादामुळें

चिकटली. झोंप उडाली. मी विचार करूं लागलों. यापेक्षां शेवटच्या डब्यांत बसलों असतों तर किती छान झालें असतें ! छे, हें पण योग्य नाहीं. याचा अर्थ एवढाच कीं, माझ्याऐवजीं दुसऱ्या कोणाचा तरी जीव धोक्यांत पडला असता तर किती बरें झालें असतें ! असा आंधळा स्वार्थ आपल्याला शोभतो का ? पण बरोबर लहान गिरधारी आहे, त्याची जबाबदारी आपल्यावर नाहीं ? असेल, पण एवढ्या जबाबदारीमुळें भित्रें बनणें हें शोभेल काय ? माणसानें फक्त आपल्या स्वतःपुरतेंच बेफिकीर रहावें आणि थोडी देखील दुसऱ्याची जोखीम शिरावर असली कीं तेवढ्यानें व्यवहारकुशल भित्रेपणा बाळगावयाचा याचा अर्थ काय ? हिम्मत आणि बेफिकीरपणा हा फक्त संन्याशांचा आणि फकिरांचाच धर्म आहे काय ? धर्माधर्माची मीमांसा झोंपेंत विरून गेली आणि सकाळीं आम्ही रंगूनला पोहोंचलों.

अनुक्रम १७८५०
विभाग ...
क्र. १५५
नों. दि. २२/२/५

# मेणबत्तीचा कारखाना

## १३

*आतां येननजांवच्या घासलेटचें अखेर होतें तरी काय हें जाणण्याची इच्छा झाली. आमचे गृहपति डॉ. मेहता यांनीं ती पूर्ण करण्याची व्यवस्था केली; इतकेंच काय पण ते स्वतःच आमच्या बरोबर आले. रंगून नदींतून लहानशा वाफरांत बसून आम्ही कारखाना असलेल्या बेटांत गेलों. वाफराच्या धक्क्यापासून कारखाना बराच दूर होता. म्हणून कारखान्याच्या लहानशा रेल्वेवरील ॲडिसांत बसून आम्ही निघालों. आमचा संघ कांहीं लहानसहान नव्हता. डॉ. मेहता,*

त्यांचे तीन मुलगे, अण्णा, जीवतराम, गिरधारी, आणि मी इतके तरी आतां आठवतात. दुसरेहि एक दोघेजण असतील. दोन बाकांवरील जागा भरून गेल्यानन्तर उरलेले लोक पुढें फूटबोर्डावर बसले. लॅडिस गरगर करीत चाललें. मुलांना गम्मत वाटली. थोडेसें अंतर गेल्यानन्तर एक वळण लागलें. तेथें एक माणूस उभा होता. त्यानें ओरडून आम्हांला सावध केलें. काय आहे तें बघण्यापूर्वीच समोरून एक एंजिन आलें. लॅडिस उभें करून सगळेजण दोन्ही बाजूंस उड्या टाकून बाहेर पडले. मी मागील बांकावर होतों. माझ्या दोन्ही बाजूंस दोन मुलें आणि माझ्या मांडीवर छोटा मगन होता. घाई करून दोन्हीं बाजूच्या दोन मुलांना बकोटीस धरून मीं खालीं उतरविलें, नन्तर मगनलाहि उचलून खालीं उतरविलें. इतक्यांत एंजिन येऊन लॅडिसावर आदळलें. लॅडिसांत मी एकटाच राहिलों होतों. एंजिनवाल्यानें आपल्याकडून शक्य तेवढी एंजिनाची गति रोकली होती. तरीहि एंजिन लॅडिसवर आपटावयाचें तें आपटलेंच. माझ्या समोरील बाकाची पाठ आणि मी बसलों होतों त्या बाकाची पाठ यांच्यामध्यें माझी छाती सांपडली. छातीला खूप जोराचा मार बसला. पण त्यावेळीं कांहीं समजलें नाहीं. सगळेजण माझ्याकडे धांवले. डॉ. मेहता तर आपल्या पाहुण्याबद्दल फारच चिंतातुर झाले. मला धडधाकट पाहून सर्वांच्या जीवांत जीव आला.

लॅडिस पुन्हां चालूं लागलें. कारखान्याच्या वाटेवर घासलेटाच्या मोठमोठ्या टांक्या राजमहालासारख्या विराजत होत्या. या कारखान्यांत येननजांवचें घासलेट शुद्ध केलें जात असलेलें मीं पाहिलें. अति शुद्ध घासलेट म्हणजे पेट्रोल. युरोपांत युद्ध केव्हां भडकेल हें जसें सांगतां येत नाहीं, तसें हें पेट्रोल केव्हां पेट घेईल हें सांगतां येत

नाहीं. युरोपांतील शांतता आणि पेट्रोलची शितळता या सारख्याच आहेत. याहून कमी प्रतीचीं घासलेटें वेगवेगळ्या नळांमधून वेगवेगळीं भरलीं जात होतीं. घासलेटचे डबे देखील येथेंच तयार होतात. पुष्कळ वर्षांपासून स्वदेशामध्यें प्रत्येक स्टेशनावर घासलेटच्या ज्या वखारी आम्हीं पहात आलों होतों त्यांचें उगमस्थान पाहून मला आश्चर्य वाटलें. हिंदुस्तानसारख्या महादेशाला प्रवाही आग पुरविण्याचें काम हें एक बेट करीत असतें याची ही केवढी महत्ता?

शेवटीं आम्ही घासलेटच्या सायीचा अथवा मळीचा कारखाना पहावयास गेलों. हा मळ तेथें घुसळला जात होता. त्यामधून पॅरॅफिन, स्टीरीन वगैरे मेणें स्वच्छ होऊन निघत होतीं. पाहून खाण्याचीच इच्छा व्हावी. घाणेरडें व्हॅसेलिन देखील या घुसळण्यांतूनच निघतें.

जवळच मेणबत्तीचा कारखाना होता. घासलेटचा धंदा मुख्य, पत्र्याच्या डब्यांचा धंदा हा आनुषंगिक धंदा आणि मेणबत्तीचा कारखाना हा जोड धंदा असें म्हणतां येईल. मेणबत्तीच्या कारखान्यांत गिरणीच्या दुष्परिणामांचें प्रथम दर्शन झालें. एका मोठ्या दालनांत असंख्य पुरुष व लहान मुलें बसलीं होतीं आणि मेणबत्तीसाठीं आसमानी रंगाच्या कागदांचे डबे बनवीत होतीं. कोणत्याहि यंत्राचा वेग या मजुरांच्या हाताच्या वेगापेक्षां जास्त असेल असें मला वाटत नाहीं. त्यांचे हात म्हणजे जणूं काय सांचाचेच भाग होते. एक डबा अनेक माणसांच्या हातामधून पसार होई. त्या लोकांचा पगार त्यांच्या कामाप्रमाणें देण्यांत येई. अमुक शें डबे झाले कीं अमुक आणे मिळावयाचे. सुरवातीस अशा कामांत मुलांना अवश्य गंमत वाटेल, त्याला मोठा रंगहि येईल. पण जर नेहमीं तेंच तेंच काम

करावें लागलें तर माणसाचें यंत्र बनून जावयाचें. दुसऱ्या भागांत हेंच काम करणाऱ्या बायका होत्या. त्यांच्या तोंडावर कसलाहि भाव दिसत नव्हता. जणूं काय त्या हर्ष आणि शोक, आशा आणि निराशा दोन्हींच्या पलीकडे गेल्या असाव्यात. शेतांत काम करणारे लोक कमी कष्ट करीत नाहींत. पण शेतकामांत अधूनमधून विनोदहि चालूं शकतो. येथें विनोदाची मनाई नसेल, पण अशा वातावरणांत माणसाला विनोद सुचेल तर ना ?

येथें जर इतकें आहे तर युरोपांत काय स्थिति असेल ? गरीब बायांची अशी स्थिति पाहून टॉमस हूडनें *The Song of the Shirt* ( सदऱ्याचें गीत ) लिहिलें असलें पाहिजे.

येथील स्थिति असाधारण वाईट होती असें कांहीं म्हणतां यावयाचें नाहीं, पण या स्थितीचें प्रथम दर्शन मला येथें झालें. मुंबई आणि बडोदा येथील गिरण्या मीं पाहिल्या होत्या, पण त्यावेळीं काम करणाऱ्यांच्या दुर्दशेकडे ध्यान जाण्याऐवजीं यंत्रें शोधून काढणाऱ्याची कल्पकता आणि एवढा मोठा व्यापार चालविणाऱ्या व्यापाऱ्यांची हुषारी याच गोष्टीकडे लक्ष लागलें होतें.

जसे गेलों होतों तसेच परत आलों. मी मात्र छातींत दुप्पट दुःख घेऊन परतलों.

अनुक्रम ९७८००
विभाग दे. प्र. ५
क्रमांक ९८८
नों. दि. २५४५
ग्रंथ संग्रहालय ठाणे